# भले बुध्दिचे सागर.... नाना

## लेखिका

सौ. सुवर्णा गणेश लिमये, पुणे

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण
आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : भले बुद्धीचे सागर... नाना
लेखिका : सौ. सुवर्णा गणेश लिमये, पुणे

प्रकाशक : सौ. मंजिरी शहासने
बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती
मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७
पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ६०/-
संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणवली-वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी-पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# मनोगत

हिंदुस्थानाला हजारो वर्षांचा इतिहास आहे हा इतिहास दैदिप्यमान उज्ज्वल असा आहे. परकियांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर झाल्या असल्या तरी ते सर्व हल्ले आपल्या पराक्रमी योध्दयांनी परतवले होते. शक, कुशाण, हूण, यवन, मोंगल यांच्यानंतर डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज असे काही क्रूर. अत्याचारी तर काही गोड बोलून घात करणारे. आक्रमक भारतावर चाल करून आले तोपर्यंत आपणहून दुसऱ्याची कुरापत हिंदुराजांनी कधी काढली नव्हती. उलट आध्यात्मिक प्रगती साधण्यात त्यांनी आनंद मानला. पण आक्रमक चाल करून आले तर शस्त्र हाती घ्यावेच लागते. शत्रुलाही क्षमा करण्याची वृत्ती असलेले भारतीय राजे एकदा निश्चय करून लढावयास उभे राहिले की. शत्रूला पार हिंदुस्थानाच्या बाहेर घालवल्या खेरीज थांबायचे नाहीत. मात्र या लढायाही जवळ जवळ २५०० वर्षांपासून चालूच होत्या. इंग्रजांसारख्या आक्रमकांनी हिंदुस्थानवर राज्य करावयास सुरुवात केली तेव्हाच त्यांनी आपले धोरण बदलले. भारताचा विकृत इतिहास लिहिला. भारतीयाचा स्वाभिमान संपवला. भारतीय पारतंत्र्यात रहाणारे व त्याच लायकीचे आहेत हे मनावर बिंबवले ज्या ज्या व्यक्तींमुळे इंग्रजांना सत्ता स्थापन करताना त्रास झाला त्यांच्याबद्दल वाईट लेखन केले, गैरसमज पसरवले, चारित्र्यावरही चिखलफेक केली.

भारताचा इतिहास घडवणाऱ्या अनेक शिल्पकारांपैकी नाना फडणीस एक शिल्पकार होते. राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी राष्ट्राचा इतिहास माहित असायला हवा. इ.स. १७७२ पासून १८०० पर्यंत मराठी राज्य सांभाळणारे, तिचा उत्कर्ष घडवणारे, सर्व तसेच सर्व परकियांवर मराठ्यांच्या पराक्रमाचा व बुद्धिमत्तेचा वचक बसवणारे नाना फडणवीस यांच्या अभ्यासाशिवाय इतिहासाचा अभ्यास पूर्ण होणारच नाही. स्वतःच्या प्राणाचीही पर्वा न करता बाल-पेशव्यांना सांभाळून राज्यावर येणाऱ्या अनेक प्रकारच्या संकटकाळात न डगमगता शांतपणे विचार करून अनेक प्रकारच्या युक्त्या योजून आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक डावपेच नानांनी यशस्वी करून दाखवले. सर्वच पेशव्यांचे

नानांवर प्रेम व विश्वास होता. राघोबाने पेशव्यांना त्रास दिला एवढेच नव्हे तर राज्यलोभाने नारायणरावाचा वध करवला म्हणून पेशव्याशी व राज्याशी एकनिष्ठ असणाऱ्या नानांना राघोबाबद्दल तिरस्कार होता. तरीही दुसरा बाजीराव पेशवा झाला तेव्हाही नानांनी मराठी राज्याच्याच हिताचे राजकारण केले. नानांनी जवळ जवळ २७ वर्षांचे राज्य सांभाळले नानांनी कशा पद्धतीने राज्यकारभार केला व शत्रूवर मात केली याच्या अभ्यासाशिवाय इतिहासाचा अभ्यास अपुरा आहे. त्यांच्या अल्पचरित्रासह त्यांचे विविध डावपेच उलगडून दाखवणारे हे लहानसे पुस्तक वाचकांना देताना मला आनंद होत आहे. या लहानशा प्रयत्नातून आपला इतिहास काय आहे हे जाणण्याची इच्छा वाचकांना व्हावी हाच या पुस्तकाचा हेतू आहे.

महाभारतातील निर्णायक युद्धप्रसंगी भगवान श्रीकृष्ण हे पांडवांच्या बाजूने उभे राहिले पण ''न धरी शस्त्र करी मी सांगेन गोष्टी युक्तीच्या चार'' असे त्यांनी पांडवांना स्पष्ट सागितले. संपूर्ण युद्धातील प्रसंग जर आपण अभ्यासले तर भीष्म, द्रोण, कर्ण यासारख्या महायोद्ध्यांना श्रीकृष्णाने आपत्वा बुध्दिचातुर्याने कोंडीत पकडून अर्जुनाकरवी मारवले आणि पांडवानी युध्द जिंकले, नानांनीही शस्त्र हाती न घेता बुद्धिचातुर्याने युद्धे खेळवली व जिंकली नानांचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास युद्ध स्वतः न करता, युद्ध जिंकणारा महान योद्धा असेच करावे लागेल.

अंकुर फुटण्याच्या काळात मुलांना याची कल्पना दिली तर खरा इतिहास जाणून घेण्याची इच्छा होईल या पुस्तकाचा प्रपंच एवढया साठीच केला आहे कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टने किशोर वयातील मुलांसाठी राष्ट्रपुरुषाची चरित्रे अत्यंत अल्प मोबदल्यात उपलब्ध करण्याची योजना हाती घेतली आहे. त्या मालिकेतील आणखी एक पुष्प!

**सौ. सुवर्णा गणेश लिमये**

**औंध रोड पुणे, दूरध्वनी – ०२०–२५६९ ०३६२**

# आशिर्वाद

राष्ट्रपुरुषांची चरित्रे, त्यांच्या जीवनातील प्रसंग, राष्ट्रहिताकरिता त्यांनी आखलेल्या व प्रत्यक्षात उतरवलेल्या योजना यासंदभातील माहिती अतिशय रंजक, भावी पिढयांना अतिशय मार्गदर्शक अशी असते. लहान मुलांना स्वदेशाचा गौरवशाली इतिहास, थोर राष्ट्रपुरुषांची चरित्रे ही अतिशय सोप्या नि त्यांना पचेल रुचेल अशा भाषेत सांगण्याची खरोखरच गरज आहे.

पुर्वीपासुनच इंग्रजांनी हेतु पुरस्सर राष्ट्रपुरुषांची चरित्रे या राष्ट्राचा इतिहास हा विकृत केला व इंग्रजी पठडीत तयार झालेल्या एत्द्देशियांनी त्यांचे तेच धोरण पुढे चालवून विशिष्ट माहिती व इतिहास एवढाच पुढे आणला व हेतु पुरस्सर या राष्ट्राचा गौरवशाली इतिहास व राष्ट्रपुरुषांची चरित्रे यापासून राष्ट्र घडविणाऱ्या भावी पिढयांना वंचित ठेवले.

अनैतिहासिक इंग्रज इतिहासकारांनी कल्पित वा स्वकल्पित अशी पात्रे व प्रसंग रचून श्रीमंत नाना फडणविसांच्या चरित्र्याला डागाळण्याचे जाणीवपुर्वक प्रयत्न केले गेले .परंतु अशा थोर राष्ट्रपुरुषांची चरित्रे डागाळण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सुर्यावर थुंकण्यासारखे होईल यात संशय नाही. सौ. सुवर्णा गणेश लिमये यांनी बालवाचकांसाठी श्रीमंत नाना फडणविणसांचे चरित्र, राजकीय कर्तबगारी सोप्या शब्दात लिखित केली आहे.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट अशाप्रकारचा राष्ट्रपुरुषांची चरित्रे छोटया वाचकांसाठी अतिशय अल्प अशा किमतीत उपलब्ध करण्याचा उपक्रम आज अनेक वर्ष राबवित आहे, त्यातीलच हे आणखी एक चरित्र पुष्प. सौ. सुवर्णा गणेश लिमये व कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट यांना हार्दिक शुभेच्छा व धन्यवाद !

**श्री. अशोक जनार्दन फडणीस**
**१७७/१७८ बेलबाग बिल्डिंग**
**बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणे– ४११००२.**
**फोन नं. २४४५८१२०**

# नाना फडणवीसांचे संक्षिप्त चरित्र



आपल्या देशात अनेक नररत्नांचा जन्म झाला आहे. त्यापैकी एक म्हणजे बाळाजी जनार्दन भानु उर्फ नाना फडणवीस राष्ट्रप्रेम, स्वामीनिष्ठा, अलौकिक बुद्धिमत्ता, योजनाकौशल्य इत्यादी गुणांचा समुच्चय त्यांच्या दायी एकवटलेला जागोजागी दिसून येतो

नानांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ ला झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील वेळास हे त्यांचे मूळ गाव. तेथे पूर्वी महादजी कृष्ण भानु रहात होते. ते त्या गावचे वतनदार होते यांना चार मुलगे नारायण, हरि, रामचंद्र व बळवंत महादजींच्या मृत्यूनंतर नारायण वेगळे झाले. इतर तिघे भाऊ एकत्र रहात होते. वेळास हे गांव बाणकोट खाडीच्या दक्षिण तीरावर आहे. त्याच खाडीच्या उत्तर तीरास श्रीवर्धन आहे तेथे बाळाजी विश्वनाथ आणि जनार्दन विश्वनाथ भट हे बंधु रहात होते. ते त्या गावचे देशमुख होते. या भागावर हबश्यांचा अंमल होता. या हबश्यांचा शत्रू आंग्रे यांनी भटास आपलेसे केले असे हबश्यांना वाटले म्हणून त्यांनी दोघा भट बंधूंना पकडावयास माणसे पाठवली. हे वृत्त समजल्याने दोघे बंधू जीव वाचवण्यासाठी तेथून त्यांचे मित्र भानु यांचेकडे वेळास येथे आले. तेथे त्यांनी सर्व वृत्त कथन केले.

कोकणात रहाण्यापेक्षा देशावर जावे. काही काम करावे असा विचार करून भट व तिन्ही भानु कुटुंबीय देशावर सातारा येथे आले. तेथे त्यांची व सेनापती धनाजी जाधवराव यांची भेट झाली. रामजी महादेव भानु, शंकराजी नारायण सचिव यांचेकडे चाकरीस राहिले. धनाजींनी बाळाजी विश्वनाथ यांना शाहू महाराजांकडे नेले भटांचे कर्तृत्व पाहून शाहू महाराजांनी त्यांना पेशवाईची

वस्त्रे दिली त्याचवेळी बाळाजीपंतानी महाराजांना विनंती करून राज्याची फडणविशीची वस्त्रे हरि महादेव भानुना दिली. तेव्हापासून हिंदवी स्वराज्याचे भट पेशवे आणि भानु फडणवीस झाले हर महादेव फडणवीस झाल्यानंतर चार पाच महिन्यात निवर्तले नंतर बाळाजी महादेव फडणवीस झाले दिल्लीला एका समारंभात बादशहाने मराठ्यास चौथ व सरदेशमुखीच्या सनदा दिल्या दिल्लीच्या इतर दरबारी लोकांना ते आवडले नाही. त्यांनी पेशव्यांना मारण्याचा कट केला तो फडणवीसांना कळला त्यानी पेशव्यांना सनदा घेऊन मार्गाने पालखीतून नेले पेशवे वाचले पण फडणवीस मात्र प्राणांस मुकले भानु घराण्यास निश्चितच ही घटना अभिनास्पद आहे. सरकारी कामात त्यांनी देह ठेवला त्यानंतर रामजी महादेव भानु हे फडणवीस झाले चार वर्षातच बाळाजी विश्वनाथ पेशवे व रामजी महादेव फडणवीस हे मरण पावले.

बाजीराव पेशवे यांनी भानुंना कधीही अंतर दिले नाही. रामाजी महादेव यांचे पुत्र बाबुराव रामचंद्र व बाळाजी महादेव यांचे पुत्र जनार्दन बलाळ हे दोघे त्यावेळी लहान होते. म्हणून एका आप्ताकडून पेशव्यानी फडणविशीचे काम करवून घेतले. दोघे भानु मोठे झाल्यावर पुन्हा आपले फडणविशीचे काम पाहू लागले. ते दोघेही पेशव्यांबरोबर स्वारीवर जात असत. जनार्दन यांना १२ फेब्रुवारी १७४२ ला पुत्ररत्न झाले त्याचे नाव बाळाजी ठेवले आपले नाना फडणीस, नानांचा जन्म साताऱ्यास झाला त्यांच्या आईचे नाव रखमाबाई असे होते. ती सरदार मेहेंदळे यांची बहिण होती. बाबूराव फडणवीस यांचा मुलगा मोरोबादादा नानांचे व मोरोबांचे शिक्षण वडील मोहिमेवर जात असल्याने आपापल्या आईच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाले त्या दोघांच्या मुजी , झाल्यानंतर पेशव्यांचे बंधू सदाशिवराव यांच्या सांगण्यावरून पेशव्यांचे पुत्र विश्वासराव व माधवराव यांच्याबरोबरच मुख्य शिक्षणास प्रारंभ झाला.

लिहिणे, वाचणे, हिशेब ठेवणे या कामांत नाना तरबेज झाले मराठ्यांच्या इतिहासाचीही ओळख त्यांना करून देण्यात आली. (त्यावेळी शिक्षकांना ही कल्पनाही नसेल की, ज्यांना आपण इतिहास शिकवत आहोत ते आपले विद्यार्थी भारताचा उज्ज्वल इतिहास घडवणार आहेत!) नानांची बुद्धि कुशाग्र

आणि प्रगल्भ असल्याने त्यांना कोणत्याही विषयाचे चटकन आकलन होत असे. नानासाहेब पेशवे यांची कारकीर्द हा मराठी सत्तेच्या वैभवाचा काळ होता: जवळ जवळ संपूर्ण भारतात मराठ्यांचा दरारा होता. नानासाहेब पेशव्यांचे बरोबर नानाचे सतत वावरणे असल्याने भारतातील सर्व सत्ताधीश, मोठमोठे सरदार, मुत्सद्दी, सावकार आणि राजकारण यांचे सूक्ष्म अवलोकन त्यांना करावयास मिळाले. त्या काळात घडलेल्या अनेक घडामोडींचे ते साक्षीदार होते. त्यांच्याकडून भविष्यात महान कामगिरी करून घ्यायची असल्यानेच नियतीने त्यांना ही संधी दिली असावी. वडील व काका हे दोघेही फडणविशीच्या कामात तरबेज असल्याने नाना त्या कामात नुसते तयार झाले असे नव्हे, तर नाना 'भानूचे' 'नाना फडणीस' झाले. त्यांचे पद हेच त्यांचे आडनाव झाले. ''नाना फडणीस'' या नावाने जगविख्यात झाले

वयाच्या चौथ्या वर्षी नानांची मुंज झाली व १० व्या वर्षी पहिले लग्न झाले. नानांचे वडील गेल्यानंतर पेशव्यांनी नानांना फडणविशीची वस्त्रे व पालखीचा मान दिला सुरुवातीला युद्धातील फडणविशीचे काम ते पहात होते. (मार्गशीर्ष शु. अष्टमी २९ नोव्हे. १७५६) पेशव्यांचे नानावर पुत्रवत् प्रेम होते. पेशव्यांचे फडणीस म्हणून पेशव्यांबरोबर ते कर्नाटक युद्धावर गेले होते. युद्धकाळातील सानिध्यामुळे पेशवे व नाना यांच्यात जास्त जिव्हाळा निर्माण झाला होता. नानांनीही त्यांना कधीही अंतर दिले नाही स्वतः चा प्राण व प्रतिष्ठेपेक्षा पेशव्यांचे प्राण व प्रतिष्ठा जपली.

श्रीमंत भाऊसाहेब पेशवे अहमदशहा अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी उत्तरेकडे जाणार होते. या स्वारीत नानासाहेब पेशव्यांचे चिरंजीव विधासराव हे प्रचंड मोठा फौजफाटा घेवून उत्तरेकडे निघणार होते. नानादेखील पत्नी व आईसह तीर्थयात्रेला निघाले. वाटेत ठिकठिकाणी देवदर्शन केले. नर्मदा ओलांडल्यानंतर नानांची तब्येत बिघडली त्यांच्यासाठी पेशव्यानी आपला मुक्काम एक दिवस लांबवला त्यांची तब्येत ठीक झाल्यावर पुढे गेले. नानांना चित्रसंग्रहाची खूप आवड होती. या प्रवासांत त्यांनी अनेक तसबिरी खरेदी केल्या.

यमुनेच्या पश्चिम तीरावर अब्दाली पाऊण लाख सेनेसह उतरल्याच्या वार्ता कानी येत होत्या. यमुना दुथडी भरून वहात होती. त्यामुळे अब्दालीचे काही चालेना. पुढे भाऊंनी कुजपुऱ्यावर चाल करून तो जिंकला, परत यमुनातिरी थांबले. यमुनेस उतार शोधून अब्दालीचे सैन्य अलीकडे आल्याची वार्ता कळली मराठे पानिपतावर तळ देऊन राहिले होते. समोर अफाट शत्रूसैन्य उभे व मराठयानी स्वत भोवती खंदक खणून ठेवला होता, या कोंडीत मराठे सापडले तरीही मराठे व मोगल यांच्यात तुंबळ युद्ध झाले. दोघांचे अतोनात नुकसान झाले, अपार हानी झाली, रक्ताचे पाट वाहले विश्वासरावांना गोळी लागून त्याचा मृत्यू झाला. मराठयांची क्रूरपणे कत्तल केली गेली. वाट फुटेल तसे मराठे पळत सुटले काही युद्धावर मेले, काही पळता पळता दम फुटून मेले काही उपासमारीने मेले त्यावेळी दक्षिणेत एकही घर असे राहिले नव्हते की, त्या घरी मृत्यूची छाया पसरलेली नव्हती. परमेश्वराच्या इच्छेने वाचलेली मंडळी लपत छपत कच्चे धान्य खाऊन, कशी-बशी घरी येऊन पोचली. कित्येक महिने मंडळी परत येत होती.

नाना फडणीस यांची पत्नी व आईशी ताटातूट झाली वेश बदलून सर्वजण लपत छपत, प्रसंगी शेताचा आसरा घेत. कांही मंडळींसह नानांनी परतीचा प्रवास सुरु केला एकदा दोनदा शत्रूच्या सैनिकांनी त्यांना पकडलेही बरोबरचे एक दोन लोक मारले गेले. रेवाडी या गावी त्यांना बाळाराव या गृहस्थाने मदत केली. वाटेत कृष्णभट वैद्य भेटले. त्यांच्याकडून नानांना त्यांची पत्नी सुखरुप असल्याचे कळले. विरोजी बारावकर यांनी तिला सांभाळून आणली असून त्यावेळी ती नारोपंत गोखले यांचेकडे आहे हे ही कळले. प्रवासातच पती पत्नीची भेट झाली. दीग या गावी गेल्यावर तेथे त्यांना पेशव्यांचे वकील पुरुषोत्तम हिंगणे भेटले, जे पानिपताहून जीव वाचून परत येत होते. दीगला नानांनी एक महिना मुक्काम केला. मातुश्रींचा खूप शोध घेतला. अब्दालीच्या सैन्यात त्या आहेत असे कळले तेथून सोडवून आणण्याचा नानांनी खूप प्रयत्न केला पण कांहीच उपयोग झाला नाही. मलढाईच्या धुमश्चक्रीत घोड्यावरून खाली पडून त्या मृत्यु पावल्या असे समजले ते ऐकून नानांना अपार दुःख झाले. नतर ते ग्वाल्हेरला गेले तेथे पार्वतीबाईसाहेब. नामा पुरंदरे, मल्हारराव

होळकर लोक भेटले हे सर्व लोक एकत्र येतच होते. वाटेतच नानासाहेब पेशवेही त्यांना भेटले श्रीमंताना मराठयांच्या संपूर्ण शहाराची बातमी तेथेच कळली तेथूनच नाना टोक्यास गेले नानासाहेब पेशवे सेथूनच परत फिरले. पण पुण्यास पोचण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. नानांना टोक्यास ही बातमी कळली त्याची व पेशव्याची पुन्हा भेट झाली नाही राघोबादादानी नानांना साताव्यास माधवरावांसाठी पेशवाईची वस्त्रे आणण्यास पाठवले. त्यानंतर माधवराव पेशवे व नाना फडणीस झाले. माधवरावांचा नानांवर पूर्ण विश्वास होता आणि नानांनीही त्यांना उत्तम साथ दिली.

आई आणि पत्नी समवेत तीर्थयात्रेला निघालेल्या नानांनी पानिपतचा संहार पाहिला विश्वासरावांचा मृत्यू सदाशिवरावाचे युध्दनेतृत्व रणांगणावरचा पराक्रम आणि त्यांचा मृत्यू युद्धभूमीवरील पळापळ रानावनातून लपत छपत उपाशीपोटी व नेसत्या वस्त्रानिशी केलेला प्रवास, पत्नीशी वाटातूट व नंतर भेट या सर्वांवर कळस म्हणजे त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम करणाऱ्या नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू यामुळे त्यांचे मन उदास झाले त्यांची वृत्ती गंभीर झाली. अनेक वेळा मृत्यूसमोर उभा असूनसुद्धा ते जगून वाचून पुण्यास आले. नियतीला त्याच्याकडून खूप कार्य करवून घ्यायचे होते. म्हणूनच तिने त्यांना सांभाळले. अनेक योध्यांसह हजारो लोक मारले गेले पण शिपाईगिरीचा अभाव असलेले. नाजूक तब्येतीचे नाना मात्र पुण्यात परत आले.'

थोरले माधवराव पेशवे यांच्या काळात पेशवे व मोगल यांच्यात लढाई झाली होती. तेंव्हा मोंगलांनी पुणे लुटले व जाळपोळही केली. त्यावेळी पुण्यातील बरेच लोक लोहगडच्या पायथ्यास जाऊन राहिले नानांनाही एका वस्त्रानिशी पळावे लागले होते. कठीण अवस्था प्राप्त झाली असतानाही पुण्याचा नाश होऊ नये यासाठी प्रयत्न करावयास ते विसरले नाहीत. माधवरावांनी ९ वर्षांच्या काळात अनेक मोहिमा केल्या. राज्याची वसुली व्यवस्थितपणे करून नानांनी त्या सर्व मोहिमांना द्रव्य पुरवले तसेच दारुगोळा. दाणा वैरणही सैन्यासाठी पाठवली. पुण्याचा कारभारही उत्तम सांभाळला. इ.स. १७६८ साली राघोबादादांनी बंड केल्यामुळे माधवरावांनी त्याचे बंड मोडले व शनिवारवाडात

नजरकैदेत ठेवले. त्यांच्या बंदोबस्ताचे जोखमीचे कामही माधवरावांनी नानांवर सोपवले होते.

नाना आयुष्यभर पेशव्यांशी व मराठा राज्यांशी प्रामाणिक राहिले. जे पेशव्यांशी अप्रामाणिक होते त्यांच्यावर नानांनी कधीही विश्वास ठेवला नाही. राजकारणात सर्वांच्या हुशारीचा उपयोग होतो म्हणून कोणाला दुखावले नाही. प्रसंगी त्यांच्यावर विश्वास ठेवल्यासारखे दाखवले. राज्याशी बेइमानी करणाऱ्यांना कठोर शिक्षा करावयास ते कधी कचरले नाहीत तलवारबाजी करता आली नाही पण लेखणीच्या जोरावर संपूर्ण भारत हालवून सोडला. कठीणातल्या कठीण प्रसंगीही धीर सोडला नाही. समोरच्या व्यक्तीने आपणास कैद करण्याचा कट केला आहे हे माहीत असूनसुद्धा त्या व्यक्तीशी बोलताना त्या व्यक्तीला आपणास कटाचा सुगावा लागलेला आहे हे कळून सुध्दा दिले नाही किंवा संतापाने चुकीचा शब्द उच्चारला नाही. इतकी स्थितप्रज्ञता त्यांच्याजवळ होती.

राघोबादादांनी नारायणराव पेशव्यांचा खून करवला तेंव्हापासून दरबारातील बरीचशी मंडळी राघोबांवर नाराज झाली होती. पण नेमके काय करावे हे कोणासही सुचेना. मग पुण्यातील मुत्सद्दी मंडळी एकत्र आली व सर्व सरदारांचे सहाय्य घेऊन त्यांनी बारभाईचे कारस्थान रचले. एकापेक्षा जास्त लोक एकत्र येणे यालाच ‘बारभाई’ असे म्हणतात. येथे ह्या लोकांनी एकत्र येऊन कारस्थान केले म्हणून त्याला बारभाईचे कारस्थान असे म्हणतात यात सखारामबापू व नाना यांच्यासह पुरंदरे, राजेबहाद्दर, विंचूरकर, गंगाधर चंद्रचूड, चिंतो विठ्ठल रायरीकर, पटवर्धन, रास्ते, पेठे, फडके, शिंदे, होळकर ही सरदार व मुत्सद्दी मंडळी सहभागी होती. राघोबादादा मोहिमेवर गेले असताना पुण्यात नारायणरावांची पत्नी गंगाबाई हिच्या नावाने कारभार सुरु केला पुढे तिला मुलगा झाला. तो ४० दिवसांचा झाल्यानंतर लगेच त्या मुलाच्या नावाने पेशवाईपदाची वस्त्रे आणवली. त्याला पेशवा करुन त्याच्या नावाने कारभार सुरु केला. त्याच्या पायाशी कायम निष्ठा ठेवली. स्वतः चा जीव धोक्यात घातला पण बालपेशव्यांना डोळ्यांत तेल घालून सांभाळले. त्यांच्या केसासही धक्का लागू दिला नाही. त्यांचा पुत्रवत् सांभाळ केला. (नानांचे वडील गेल्यावर पेशव्यांनी

नानावर पुत्रवत् प्रेम केले होते ) नारायणरावांच्या मुलाचे नाव माधवराव असे ठेवले तेच पुढे सवाई माधवराव म्हणून ओळखले जाऊ लागले त्यांच्या नावाने राज्य कारभार सुरु केल्यानंतरही राज्यावर खूप सकटे ओढवली पण त्या सर्वांतून मार्ग काढून पेशव्यांची नानांनी मुंज केली. बालपेशव्यांचे हट्टही पुरवले रंगाचा दरबार भरवला. (सर्व सरदार व मुत्सद्दी यांच्या संगे पेशवे रंग खेळले) मराठ्यांचे सर्व सरदार एकत्र आणले व शत्रू चूपचाप बसवले मराठी राज्याचा वचक सर्व शत्रूवर बसवला एकूणच ही १० वर्षे मराठी राज्याला फार कठीण गेली. पंतप्रधानपदी लहानसे बालक विराजमान झालेले होते पण राजकारण व तलवार नाना व महादजी यांनी निभावून नेले. राजनिष्ठ सरदारांनी त्यांना उत्तम साथ दिली त्यामुळेच अनेक विजय प्राप्त झाले. जुनी येणी वसूल झाली. दक्षिणेला हैदर, मुंबईला पटवर्धन व तुकोजी होळकर, उत्तरेला महादजी शिंदे आणि समुद्रावर दर्यासारंग धुळप यांनी इंग्रज गप्प केला. राज्य स्थिर झाले. मराठ्यांच्या पराक्रमाच्या नौबती वाजत होत्या अजिंक्यत्व सिद्ध झालेले होते. त्याचा आनंदोत्सवही व्हायला हवा होता.

नानांनी पेशव्यांच्या विवाहाची घोषणा केली व वातावरणात सनईचे सूर बाजू लागले. सर्व मराठा मंडळ आणि रयत पेशव्यांना परमेश्वराचेच अवतार मानत होते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. हिंदुस्थानात सर्वत्र विवाहाची आमंत्रणे गेली. सर्व प्रातांतून श्रेष्ठ राजकारणी व्यक्तींसह अनेक मुत्सद्दी विवाहास आले. मराठ्यांचे वैभव पाहून इंग्रज व फ्रेंचाचे डोळे दिपले. एकी पाहून आपल्याला मराठी राज्यात पाय रोवता येणार नाहीत याची खात्री पटली. युरोपीय राष्ट्रांवर जो परिणाम व्हावयास हवा होता तो घडला. तो घडेल अशी खबरदारी घेतली होती. या सोहाळ्याच्या निमित्ताने नानांनी एका दगडात दोनच काय पण चार पाच पक्षी मारले !

या सर्व घटनामुळे साहजिकच नानांना खूप मान मिळत होता. त्यांच्या शब्दाला खूप महत्त्व होते त्यांना मिळणारी प्रतिष्ठा पाहून त्यांचा हेवा करणाऱ्या लोकांनी परत कट कारस्थाने करण्यास सुरुवात केली. ही कट कारस्थाने मोडून काढणे, पेशव्यांना सांभाळणे व मराठी राज्याची प्रतिष्ठा वाढवणे यात त्यांचे

बरेच दिवस गेले. ही सर्व कट कारस्थाने मोडण्यासाठी व उलटवण्यासाठी त्यांनी जे राजकारण केले. शत्रूवर विविध डावपेच टाकले तेथे त्यांच्या बुद्धिचातुर्याची कमाल दिसून येते. त्यांच्या प्रत्येक कृतीमागचा उद्देश समजून घेतला की, भले बुद्धिचे सागर नाना असे म्हणावेसे वाटते.

शिपाईगिरी करत नसूनही भले भले योद्धे, प्रामाणिकपणा, बुद्धिचातुर्य या गुणांवर आणि लेखणीच्या जोरावर फिरवले मोठमोठी युद्धे खेळवली, जिंकली. इंग्रजांसारख्या शत्रूचाही पराभव केला. नाना इंग्रजांपासून कायम सावध असत, त्यांनी इंग्रजांना कायम शह दिला. मराठयांच्या राजकारणात त्यांचा उपयोग करून घेतला पण मराठ्याच्या अंतःस्थ कारभारात इंग्रजांना शिरकाव करू दिला नाही. मराठ्याच्या संबंधात नाना ही एक मोटी निर्णायक शक्ती आहे, याची इंग्रजांना पूर्ण जाणीव होती. टिपुशी झालेल्या युद्धात निजाम, पेशवे व इंग्रजांचा जय झाला पण शांतता तहात नानांनी इंग्रजांना डोईजड होऊ दिले नाही. टिपूचा समूळ नाश न करता, सत्तेचा समतोल ठेवून मराठी राज्य राखणे हे त्यांनी त्या तहात मिळवले. दोन सत्तांना झुंजवत ठेवून आपण वेळ पडल्यास मदत करून स्वराज्याचा फायदा कसा होईल तेवढेच ते पहात असत. त्यांनी आपले आयुष्य व संपूर्ण बुद्धिमत्ता स्वराज्याच्या चरणी वाहिली होती. नानांच्या कारकीर्दीबद्दल एल्फिस्टन म्हणतो की, 'मराठी सत्तेचा ऱ्हास नानांनी हयात असेपर्यंत थोपवून धरला होता.' स्वदेशाभिमान नसानसातून खेळत होता. वाममार्गाने कधीही नानांनी पैसा मिळवला नाही. थोरल्या माधवराव पेशव्यांनी काढलेल्या कर्जाचीही त्यांनी हमी घेतली त्यामुळे मृत्यू समयी माधवराव निश्चिंत झाले. त्यांना सुखाने मरण आले.

नाना नेहमीच सावधतेने वागत. राज्यासाठी त्यांनी कट कारस्थाने केली पण त्यांच्या हातची एकही चिठ्ठी पुराव्यासाठी सापडली नाही. वेगवेगळ्य सरदारांशी त्यांनी अतिशय हुशारीने संबंध ठेवले होते. नानांनी राज्य राखले असे म्हटले तरी शिंदे, होळकर, पटवर्धन व इतर मातब्बर सरदारांनी त्यांना सहाय्य केले होते हे निःसंशय खरे आहे. शिंदे व नाना यांची खूप मैत्री होती.

पण शिंदे हे पेशव्यांना डोईजड झालेले नानांना आवडत नव्हते.

एकमेकांच्या अडचणीच्या वेळी आपले मतभेद विसरून ते दोघे एकत्र येत. त्या दोघांचा धाक फितूर, लबाड, राज्यद्रोही लोकांना वाटत होता पुण्याची सत्ता ताब्यांत घेण्याचा प्रयत्न शिंद्यांनी केला. तेव्हा सवाई माधवरावांनी पाटीलबुवा, नाना आणि तुम्ही हे माझ्या राज्याचे दोन हात आहेत त्यात नाना उजवा हात असून तुम्ही डावा हात आहात दोघांच्या सहाय्याने राज्याची भरभराट होत आहे. मी कोणताही हात तोडू इच्छित नाही असे सांगितले. शिंदे काय समजायचे ते समजले ''राखावी बहुताची अंतरे या उक्तीप्रमाणे नाना वागत असत शिंदे व होळकर हे पेशव्यांचे मातब्बर सरदार पण ते दोघे एकमेकांशी नेहमी स्पर्धा करत. काही वेळा पेशव्यांच्याही विरोधात जात नानांना मिळणाऱ्या मानमरातबामुळे त्यांच्या मराठेशाहीतील वर्चस्वामुळे, नानांशीही स्पर्धा करत. काही वेळा ह्या भांडणाचे स्वरुप उग्र रुप धारण करत असे. अशावेळी नानांना सर्वांना सांभाळून घ्यावे लागत असे राज्याचे होणारे नुकसान, इतर सरदाराची कलुषित होणारी मने ह्या सर्वांवर त्यांना लक्ष ठेवावे लागत असे. अशावेळी नाना विविध युक्त्या योजत होळकर व शिंदे यांना कधी एकत्र आणावयाचे तर कधी त्याची जोडी फोडायची. त्यांच्यात किंचित तेढ निर्माण करावयाची मात्र त्या दोघांना एकमेकांचे शत्रू बनवले नाही दोघांना त्यांनी सारख्याच अंतरावर ठेवले होते. आलटून पालटून ते एकास जवळ करत.

त्यामुळे दोघेही नानांच्या ऐकण्यात आले. दोघांनाही आपण नानाच्या जास्त विश्वासातील आहोत असे वाटे. त्यांच्या अडचणीच्यावेळी नाना त्यांना मदत करत व स्वतः च्या अडचणीच्या प्रसंगी त्यांनाही बोलावत, पेशवे आहेत तोवरच आपल्या सर्वांच्या कर्तृत्वाला अर्थ आहे हे पटवत कांही लोक शिंदे व होळकराच्यात नानांनी दुही निर्माण केली म्हणून दोष देतात पण वैयक्तिक फायद्यासाठी नानांनी हे केले नाही. केवळ मराठ्यांच्या राज्याच्या बचावासाठी त्यांनी ही कृती केली. त्यातून त्यांची राज्यनिष्ठा व बुद्धिमत्ता दिसून येते. राजकारणात केव्हाही कोणीही एकमेकांच्या विरुद्ध उठतो. शिंदे, होळकर यानी एकदा नानांस मारावे किंवा धरावे असा कट केला होता. तर अनेकदा त्यांनी नानांसाठी युद्धही केलेली आहेत. निजामाबरोबरचे युद्ध, पेशवे व फडणीस यांची

सोंगे निजामाच्या दरबारात नाचवून त्यांचा अपमान केला म्हणून झाले आहे. सर्व सरदार एकत्र आले व निजामाचा खूप मोठा पराभव केला.

नानाचे बंधू मोरोबादादा हे ही नानांचा द्वेष करत असत. नानांना मिळत असलेले महत्व त्यांना सहन होत नसे त्यानी नानाना खूप त्रास दिला. त्यांना अटक करण्याचेही कारस्थान केले. मोरोबांच्या कारस्थानाचा पत्ता लागल्याबरोबर १५ ते २० दिवसांत नानांनी सर्व ठिकाणांहून मदत घेऊन सैन्याच्या हालचाली सुरु केल्या हे कारस्थान मोडून काढण्याचे दोन मार्ग होते एक म्हणजे मोरोबांशी सरळ सरळ युद्ध करावयाचे नानाजवळ सैन्य बरेच होते पण यामध्ये मनुष्यहानी होईल, रक्तपात होईल. जी शक्ती शत्रूशी भाडण्यासाठी वापरावयाची ती आपसात भांडण्याचे कामी खर्च करायची हे त्यांना पटेना या सर्व कारवाईत इंग्रजांनी डाव साधला तर? लढाईच्या सर्व परिणामीचा सर्वसाकल्याने विचार करून मग कारवाई करावयाची ही सवय असल्याने त्यांनी दुसरा विचार केला तो म्हणजे ''पड खाण्याचा!'' त्यामुळे राज्याचे नुकसान होत नाही. प्राणहानीही होत नाही पुढे योग्य वेळ येताच मुळचा अधिकार परत मिळवता येईल (तो त्यांनी मिळवला) राज्याचे नुकसान होऊ नये म्हणून नानांनी पड खाण्याचा मार्ग शोधला वैयक्तिक अपमान त्यांनी सहन केला ''व्यक्ती पेक्षा राष्ट्र श्रेष्ठ आहे हे कृती करून दाखवून दिले.''

दुहेरी डावपेच खेळून प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी नानानी सारी बुद्धिमत्ता पणास लावली. त्याच्या शत्रूना त्यांच्या कारस्थानाची चाहूलही लागत नसे. त्यांचे गुप्तहेर खाते अव्वल दर्जाचे होते. म्हणूनच त्यांनी मातब्बर शत्रूवरही मात केली.

१७७४ पासून २६ वर्षे नानांनी राज्यकारभार केला. शेवटची ५ वर्षे पेशव्यांनीच गोंधळ माजवला. ती पाच वर्षे सोडली तर २१ वर्षे नानांनी राज्यकारभार कसा केला ते आपण पाहू पहिली ८ वर्षे खूप गडबडीची गेली त्याकाळात खूप नुकसान झाले पुढची १३/१४ वर्षे ते नुकसान भरून काढण्यात गेली. राज्यात खरी सुधारणा करण्यास त्यांना मनः स्वास्थ्य व शांतता कधीच मिळाली नाही, तरी सवड काढून नाना एकदा रायगडावर गेले होते तेथे त्यांनी

शिवाजी महाराजांच्या दरबाराची व सिंहासनाची जागा पाहिली. त्या जागी बळद निर्माण झाले (धान्याचे कोठार) होते ती स्थिती पाहून त्यांना फार दुःख झाले. स्वराज्य स्थापनेचे महान कार्य ज्या ठिकाणी घडले. शिवाजीराजांना जेथे राज्याभिषेक केला गेला त्या पवित्र वास्तूची अवस्था ते पाहू शकले नाहीत. त्यांनी ती जागा साफ करवून घेतली. त्या ठिकाणी ब्राह्मणाकरवी रोज पूजा करवण्याचा प्रघात सुरु केला. रोज सनई चौघडा वाजवण्याची आज्ञा केली. तेथे येणाऱ्या प्रत्येकाने त्या जागी मुजरा केला पाहिजे असा दंडक घातला. नाना असेपर्यंत ही प्रथा चालू होती. जमाबंदीची नवीन व्यवस्था लावली नवीन वसाहती करवल्या. पडजमीन लागवडीस आणल्या. पाटबंधाऱ्याची कामे करविली. रयतेच्या सोईसाठी अनेक व्यवस्था करवल्या त्यांच्या काळात रयत निश्चित राहत होती. 'रयतेवर एकंदर जलेली न करणे' हा नानांचा खासदस्तुरचा शेरा प्रत्येक हुकुमाच्या शेवटी दिसतो. 'सरकार नुकसान न करता' काम विल्हेस लावणे ही सूचना आढळते. नानांच्या कारभारात दक्षता व टापटीप असे. गोष्ट कितीही साधी असो तिच्यात अंतर्भूत होणाऱ्या प्रत्येक गोष्टीची नोंद असे.

साधी पूजेची गोष्ट बघा नानांनी जी देवालये बांधली. तेथे देवाची पूजा कशी, केव्हा करावी याचा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. काकड आरती केव्हा करावी. देवाची पूजा किती वाजता करावी. देवाचा पोशाख कोणत्या वारी कोणत्या रंगाचा असावा, शेजारती किती वाजता करावी. काही विशेष दिवशी व इतर दिवशी देवाच्या नैवेद्यात काय काय पदार्थ असावेत इ. बारिक सारिक गोष्टी तपशीलासह त्यांनी लिहून ठेवल्या आहेत. नानांनी केलेल्या सूचनातील बारकाव्याचे सुंदर उदाहरण पहा. आजच्या काळापेक्षा तेंव्हा तेल स्वस्त होते. तरीही देवासाठी चार आण्याचे तेल वापरावे असे न लिहिता एक शेर तेल वापरावे असे लिहिले आहे. तेल किती हवे ते सांगितले आहे. केवढ्याचे घ्यावे ते सांगितले नाही. अन्यथा आज चार आण्याला तेल किती मिळणार मग दिवा लावावयासच नको असे झाले असते नाही का ?

सवाई माधवरावांची मुंज, लग्न इ. समारंभाच्या प्रत्येक कार्यक्रमाला लागणाच्या वस्तूच्या याद्या करून ठेवलेल्या आढळतात. जेवणास कोणास

बोलावायचे व भोजनात काय पदार्थ असावेत याचीही नोंद आढळते. नानांच्या कारकिर्दीतील सरकारी दप्तर म्हणजे पेशवाई राज्यातील सर्व घडामोडींचा आणि बखेड्यांचा अत्यंत विश्वसनीय असा प्रचंड इतिहासच होता. गुप्तहेर खात्यावर नानांची खूपच भिस्त होती. परराज्यातील वकील पेशव्यांच्यादरबारी होते. त्या प्रत्येकांशी बोलावयास नानांनी वेगवेगळे मुत्सद्दी नेमले होते. त्यांच्या कचेरीत ३०० कारकून होते. कचेरीस फड असे म्हणत पेशवाईत अत्यंत महत्वाची संस्था म्हणजे 'पंचायत' ही होती. गावातील न्याय-निवाडे प्रथम गावच्या पाटलाकडे नंतर पुढे 'पंचायतीत' होत. गावांत बंदोबस्ताचे काम पाटलाकडे असे. दरवर्षी मामलेदार बदलला जाई. त्यास प्रजेशी इमानाने वागण्याची ताकीद दिलेली असे गुन्ह्याच्या चौकशीचे व गुन्हेगारास शिक्षा करण्याचे अधिकार पाटील व मामलेदार यांच्याकडे असत. देहान्त शिक्षा द्यायची झाल्वास तो खटला नानांसमोर व पेशव्यांसमोर येत असे.

संपूर्ण हिंदुस्थानात मराठ्यांचा अंमल असावा हीच त्यांची इच्छा होती. इंग्रज हे लबाड आहेत यास्तव नाना त्यांच्यापासून कायम सावध असत इंग्रजांची ''पारख नानांनी केव्हाच केली होती. त्यामुळे ते हयात असेपर्यंत इंग्रजांचे त्यांच्यापुढे काही चालले नाही नाना गेल्यानंतर दोन वर्षांच्या आत इंग्रजानी हिंदुस्थानात सत्ता स्थापन केली यावरूनच त्यांच्या चातुर्याची कल्पना येऊ शकते. इंग्रजांचा पुण्याचा वकील कर्नल पाल्मर लिहितो की '' नाना फडणीस गेले आणि त्या बरोबरच मराठी राष्ट्रातील शहाणपण व नेमस्तपणाही लयास गेला.

पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही पंचमहाभूते आहेत. यातील एकेक जण प्रचंड ताकदीचा आहे. हे आपणास ठाऊक आहेच. प्रत्येकाजवळ दुसऱ्याला संपवण्याची ताकद आहे. पण,

तरी भूता परस्परे । उघड जाती स्वभाववरे।
नव्हे पृथ्वी ते नीरे। नाशिजे।। १४३ अ १३

अर्थ - पंचमहाभूताचे एकमेकाशी जातीस्वभाववरून उघड उघड वैर असल्याचे प्रसिद्ध आहे पहा की पाणी हे पृथ्वीचा नाश करीत नाही काय ?

(१४३)

**नीराते आटी तेज तेजा वायूसि झुंज**

**आणि गगन तव सहज । वायू भक्षी ।। १४४**

पाण्याचे शोषण तेज करते तेजाचे वायुशी वैर आहे. आणि आकाश हे वायुस सहजच गिळून टाकते (१४४)

**ऐसा पाचही भूते । न साहती एकमेकाते ।**

**की तिथेही ऐक्याते । देहासी येती ।। १४६**

अशा प्रकारे पंचमहाभूते एकमेकास सहन करीत नाहीत पण अशी विरुद्ध असूनही ती देहामध्ये विरोध न करता एकत्र राहतात. (१४६)

**द्वंद्वाची उखिविखी सोडूनि वसती एकी।**

**एकेकाते पोरवी । निजगुणे । १४७**

इतकेच नव्हे तर पूर्वीचा दुजेपणाचा वादविवाद सोडून एकोप्याने एकत्र राहतात व ती आपापल्या गुणांनी एकमेकांचे पोषणच करतात (१४७)

**ऐसे न मिळे तया साजणे । चळे धैर्ये जेणे ।**

**तया नाम म्हणे । धृती मी गां ।। १४८**

याप्रमाणे त्यांची स्वभाव वैरामुळे कधीही न होणारी मैत्री ज्याच्या योगाने होते व हे ज्या धैर्यामुळे राहते त्या वृत्तीला ज्ञानेश्वर माऊली घृती असे म्हणतात १४८ या ओवीत वर्णन केल्याप्रमाणे या पंचमहाभूतांना एकत्रित बांधणारी व त्यांचा समतोल राखणारी जी शक्ती आहे तिला ''धृती '' असे म्हणतात: त्याप्रमाणे टिपू, निजाम, भोसले, शिंदे, होळकर. ही सर्व बडी मंडळी एकमेकांचा नाश करू शकतात. परंतु नानांनी या सर्वांना एकत्रित ठेवले. त्यांच्यातील भांडणाचा व मैत्रीचा स्वराज्याच्या कामासाठी, उत्कर्षासाठी हितासाठी उपयोग करून घेतला. या सर्वांना एकत्र बांधणारे 'नाना' हे एकमेव सूत्र होते. पेशव्यांचे व नानांचे वैयक्तिक शत्रूही नानांच्या बुद्धिमत्तेसमोर मान लवतात. नानांचा कोणता शत्रू कधी त्याच्याबाजूचा होई ते इतर शत्रू व मित्रांनाही कळत नसे. निजामाचा ओलीस म्हणून ठेवलेला वकील मशीर उलमुल्कने तो नानांच्या कैदेत असतानाही त्याने नानाना मदत केली नानांच्या

कटात तो सामील आहे हे नानांच्या शत्रूना त्याच्या प्रत्यक्ष कृतीनंतरच समजले नाना शब्दाचे सच्चे आहेत यावर त्यांच्या सर्व शत्रू व मित्रांचा विश्वास होता. या सर्व गोष्टीवरून आपल्या लक्षात येते की नानांची बुद्धिमत्ता म्हणजेच ज्ञानेश्वरांनी मांडलेली धृती ही शक्ती म्हणता येईल. नानांनी आपल्या बुद्धिचातुर्याने शत्रूचे नियमन करून मराठ्यांचे राज्य उत्तम राखले.

सरकारदरबारी काम करत असताना हाती असलेल्या अधिकाराची मर्यादा नानांनी कधीच ओलांडली नाही. राघोबादादा किंवा त्यांचे पुत्र बाजीराव हे पेशवेपदावर असावेत ही गोष्ट नानांना प्रथमपासूनच अमान्य होती पण त्या ‘‘बाबतीत हे बोलले नाहीत. आपण फक्त फडणीस आहोत हे ते पूर्णपणे जाणून होते आपली पायरी त्यांनी कधीच सोडली नाही. सवाई माधवराव यांनी मनाच्या अस्वास्थात आत्महत्या केली त्यावेळी त्यांचा नाईलाज झाला त्यावेळी पेशव्यांच्याच वंशातील बाजीराव पेशवा झाला तरी नानांनी त्या पेशव्यांच्याच हिताचा कारभार केला इंग्रजांचे फर्मान स्वीकारताना त्यांनी ज्या अटी घातल्या त्यावरून ही गोष्ट सहज लक्षांत येते स्वराज्याचा त्यांना जाज्ज्वल्य अभिमान होता

बाजीरावास मात्र त्यांचा कधीच विश्वास वाटला नाही, तर त्यांचे भय वाटले अडीअडचणीत नानांचाच सल्ला बाजीराव घेत असे. त्यांचे महत्त्व समजत होते तरी स्वार्थापोटी तो त्यांना दूर हटवू पहात होता. तेही करणे त्याला शक्य झाले नाही. नानांच्या विरुद्ध तो नेहमी कट-कारस्थाने करत असे. नानांच्यात शिपाईगिरीचा अभाव होता याचे नानांना फार वैषम्य वाटे.

नाना विषयवृत्तीचे होते तसेच ते परमेधराचे भक्तही होते. आपल्यात असणारा दुर्गुण त्यांना ठावूक होता. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी जपजाप्य ‘‘ उपासना व ध्यान धारणा या मार्गांनी या मनोविकारांवर बराचसा ताबा मिळवला होता. त्यामुळे या दुर्वासनेला बळी पडून त्यांच्या हातून औचित्य व सौजन्य भंग कधीही झाला नाही नानांच्या स्त्रीलंपटपणाविषयी राघोबादादा व त्याचे पक्षीय आणि इंग्रजांनी त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले आहेत ते सर्वस्वी निराधार व द्वेषमूलक आहेत. त्यास मराठी किंवा मुसलमानी इतिहास ग्रंथातून कोठेही आधार सापडत नाहीत. नानांनी राघोबास पेशवेपद उपभोगू दिले

नाही व नानाच्यामुळे इंग्रजांना भारतात सत्ता स्थापन करण्यास खूप त्रास झाला नानांनी फ्रेंचाबरोबर मैत्रीचे करार केले त्यामुळे इंग्रजांचा खूप मोठा कालखंड वाया गेला त्यामुळे काही इंग्रज लेखकांनी मुद्दाम त्याचे चारित्र्यहनन केले. इंग्रजाळलेल्या एतद्देशीयांनीही त्याचीच री ओढली नानांच्या बद्दल वाईट साईट बोलून त्यांना दोष देणे म्हणजे मध्यान्हींच्या सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. ती थुंकी थुकणाऱ्याच्याच अंगावर पडते !

राज्यात चाललेल्या विपरीत घटनांमुळे नानांचे मन उदास झालं, मनात असंतोष निर्माण झाला हळूहळू त्यांची शक्ती क्षीण होत गेली. तरीही सरकारी काम अत्यंत शिस्तीत करत होते फाल्गुन तृतीया १३ मार्च १८०० या दिवशी मध्यरात्रीस त्यांचे देहावसान झाले नानांचे चरित्र येथेच संपते नानांचे चरित्र म्हणजे १७७२ पासूनचा मराठेशाहीचा, स्वराज्याचा इतिहास होय.

हाती तलवार नसताना केवळ कल्पकतेच्या जोरावर मोठमोठी युध्दे खेळवून मराठ्यांची प्रतिष्ठा वाढविली. हिंदुस्थानात मराठ्यांच्या पराक्रमाचा वचक बसविला असा कलमधारी शूर लढवय्या अन्य कोणी असेल असे वाटत नाही.

राजकारणाला आवश्यक असे सर्व गुण त्यांचे जवळ होते. त्याच बरोबर स्वामीभक्ती व राष्ट्रप्रेम नसानसातून वाहत होते. नानांच्या मृत्यूने मराठी राज्याची अपार हानी झाली. त्यांच्या मुत्युनंतर दोन वर्षांच्या आत इंग्रजांनी सत्ता स्थापन केली हाच त्यांच्या कर्तृत्वाचा, वक्तृत्वाचा व कलमबहादुरीचा पुरावा आहे.

## नानांच्या बुध्दिचातुर्याचे विविध पैलू

आतापर्यंत आपण नानांच्या चरित्राचा अल्पसा परिचय करुन घेतला राज्यावर चहुबाजूंनी संकटे येत होती त्या सर्व संकटातून मार्ग काढणे खरोखरीच अवघड होते पण नानांनी विविध डावपेच आखले व प्रतिपक्षावर मात केली ते डावपेच हे नानांच्या बुध्दिवैभवाच्या, वाक्चातुर्याच्या राजनिष्ठेच्या खुणाच आहेत नाना हयात होते तोपर्यंत इंग्रजांचे हात मराठी राज्याला स्पर्श करू शकले नाहीत त्यामुळे इंग्रजांना नाना काट्यासमान सलत होते. बुद्धिमान नानांनी इंग्रजांचे डाव आधीच ओळखले होते म्हणून त्यांनी इग्रजांना चार हात दूरच ठेवले होते आणि

आपले राज्य राखले होते. नानांच्या स्वभावाची, अलौकिक बुद्धिमत्तेची ओळख करून घ्यायची असेल तर विविध प्रसंगी, संकटसमयी नाना फडणीस कसे वागले ते समजून घ्यावे लागेल.

**नर्तिकेला नृत्य करताना पहावे, तबलजीला तबलावादन करताना पहावे, खेळाडूला मैदानात पहावे, तर योध्याला समरांगणात पहावे.**

कारण त्या त्या व्यक्तीचा गुण त्या त्या विशिष्ट वेळी प्रकर्षाने जाणवत असतो त्या व्यक्तीचे अंगभूत कौशल्य त्यावेळी बहरास आलेले असते. तसेच राजकारणी मुत्सद्याला त्याच्या बुध्दिवैभवाने प्रतिस्पर्ध्यावर टाकलेल्या डावपेचात पहावे. त्याच्या बुध्दिची करामत, ताकद तेथे दिसून येते. तेव्हा नाना समजून घ्यायचे असतील तर. तेव्हाची परिस्थिती व त्या परिस्थितीवर त्यांनी केलेली मात. दूर ठेवलेले शत्रू, त्यासाठी खेळलेली खेळी, टाकलेले शाब्दिक फासे हे समजून घ्यावे लागतील. एखादा बुध्दिबळपटू आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या चार/चार, आठ/ आठ डावांचा विचार करतो किंवा आपणास हवी तशी खेळी करावयास भाग पाडतो त्याप्रमाणे नाना आपले एक नव्हे अनेक शत्रूच्या पुढच्या खेळींचा विचार करून शिवाय आपणास हवी तशीच चाल त्यांचे प्रतिस्पर्धी कसे करतील असे राजकारण लढवत होते. नानांच्या विविध गुणांचे दर्शन व वैशिष्ट्यांचे दर्शन पुढील कथांमधून घडेल. नाना फडणवीसांच्या चातुर्यकथा व बिरबलाच्या चातुर्यकथा ह्या सारख्याच प्रतीच्या आहेत असे लोकांस वाटेल, पण तसे नाही. नानांचे शहाणपणा अधिक मोलाचे आहे कारण त्या शहाणपणामुळेच इंग्रज २६ वर्षे मराठी दौलतीपासून दूर राहिला. नाना फडणवीस हे आपल्या देशातील एक अद्वितीय मुत्सद्दी होऊन गेले नाना भानुंनी मराठी दौलतीवरचा सूर्य मावळू दिला नाही.

## अक्षरसुलेखनकार नाना

नाना फडणवीसांच्या पूर्वीपासून, किंबहुना शहाजीराजांपासून मराठी पत्रव्यवहार मोडी लिपीतून चालत असे मात्र शहाजीराजांच्या किंवा त्यांच्या

आधीच्या काळातील मोडी लिपीवर उर्दूचा प्रभाव जाणवतो. त्यानंतर मोडी लिपी ही वळणदार लिपी म्हणून अधिक विकसित झाली. लेखणी न उचलता कागदाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सलग लिहित जाणे हे मोडीचे वैशिष्ट्य. या वैशिष्ट्यामुळे ''व्यक्तीनुसार मोडी अक्षर बदलत असे. नानांनी मोडीतून पत्रव्यवहार करताना मोडी अक्षराला निश्चित वळण लावण्याचा प्रयत्न स्वतःच्या हस्ताक्षरातून केला. नाना फडणवीसांनंतरच्या काळातील पत्रे पाहिल्यास हे लक्षात येते की मोडी अक्षर प्रमाणित व वळणदार, सुवाच्च झाले होते. नानांचे अक्षर अत्यंत उत्कृष्ट असल्याने, त्यांच्या व्यक्तिमत्वातील शिस्तीचे प्रतिबिंब त्या अक्षरात दिसत असल्याने, त्यांच्यापासून स्वैर पध्दतीने मोडी अक्षराची वळणे काढणे बंद झाले त्यामुळे मोडी लिपीचे प्रमाणिकरण एकप्रकारे नानांनी केले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## १. भानु घराण्यातील मित्रप्रेम

नाना फडणवीस शब्दाचे पक्के होते. दिलेला शब्द पाळणारे होते. त्यामुळे त्यांच्या शब्दासाठी लोक आपला प्राणही द्यावयास तयार असत. हा गुण त्यांच्या घराण्यातच होता. असे म्हणावे लागेल, भट व भानु यांचे फार पूर्वीपासूनचे मैत्रीचे संबंध होते. बाळाजी विश्वनाथ भट व त्यांचे बंधू जनार्दन भट हे दोघे श्रीवर्धनचे राहणारे श्रीवर्धन सिद्दीच्या ताब्यात होते सिद्दी व आंग्रे यांचे पटत नव्हते. भट हे आंग्रे यांना मिळालेले आहेत असा संशय आल्याने सिद्दीने जनार्दन भट यांना पकडून समुद्रात बुडवून ठार मारले. जिवास धोका आहे म्हणून बाळाजी विश्वनाथ वेळास येथे भानुंकडे आले. तेथून नशीब काढण्यासाठी देशावर जाऊ असा निर्णय त्यांनी घेतला. वेळास सोडण्यापूर्वी भट व त्रिवर्ग भानू यांनी आपण एकमेकांस कधीही सोडावयाचे नाही अंतर द्यावयाचे नाही. अशा शपथा घेतल्या. वेळास सोडल्यावर वाटेतच सिद्दीच्या लोकांनी बाळाजीस ओळखून पकडले व कैद केले. भानुंनी शब्द दिल्याप्रमाणे त्यांच्या सुटकेचे अनेक प्रयत्न केले. लवकर यश येईना. भानु थकले नाहीत व भटास एकटे टाकून पुढेही गेले नाहीत. अखेर त्यांच्या प्रयत्नांना मोठया मुश्किलीने यश

आले. बाळाजींची सुटका झाली मगच ती मित्रमंडळी पुढे निघाली.

बाळाजी विश्वनाथांचा मुलगा बाजीराव यानेही मैत्रीत अंतर पडू दिले नाही फडणवीसी वंशपरंपरा भानुंच्याचकडे ठेवली. त्याच भानुंच्या वंशजाने, बाळाजी जनार्दन भानु उर्फ नाना फडणवीस यांनी मरेपर्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने, प्रेमाने, सचोटीने, न्यायाने पेशव्यांचे फडणीस म्हणून काम केले. एवढेच नव्हे तर पेशव्यांची प्रतिष्ठा वाढविली. हिंदुस्थानवर मराठयांचा वचक बसवला. नानांनी एक इतिहास घडवला. राजकारणातील एक विख्यात मुत्सद्दी म्हणून जगात प्रसिध्द झाले.

## २. मितभाषी पण ईश्वरनिष्ठ नाना

नाना मितभाषी, गंभीर प्रवृत्तीचे आणि अत्यंत कडक स्वभावाचे होते. पण नाना असे का बनले याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्या आयुष्यातील त्यांच्या प्राणावर बेतलेल्या प्रसंगाने नानांना अंतर्मुख बनवले असावे असे वाटते.

तो प्रसंग पुढील प्रमाणे-

सदाशिवरावभाऊंच्या बरोबर नाना उत्तरेस गेले होते. जाताना बरोबर पत्नी व आई यांनाही नेले होते. त्यांना तीर्थयात्रा करावयाची होती. त्यांचा पहिला मुलगा वारला होता. म्हणून ते अत्यंत दुः खी होते. तीर्थयात्रेने मन शांती मिळेल म्हणून ते निघाले होते. वाटेत देव दर्शन झाल्याने त्यांना समाधान वाटले खरे पण पानिपत येथे झालेल्या प्रचंड रणसंग्रामात त्यांची वाताहात झाली.

पती-पत्नीची ताटातूट झाली. आई मृत्युमुखी पडली. विश्वासराव व सदाशिवराव यांना मरण ज्या युध्दात आले त्याच युध्दात त्यांचे मामा मारले गेले व मामी सती गेल्या, सामान हरवले व धनही हरवले, वेष बदलून तर कधी केवळ लंगोटी लावून त्या कडाक्याच्या थंडीत चालत. पळत, शेतामध्ये लपत छपत, कधी उपाशीपोटी तर कधी कच्चे धान्य खाऊन वाटचाल केली. शत्रुच्या सैनिकांनी एकदा दोनदा पकडूनही न मारता सोडून दिले ह्या सर्व घटना एकापाठोपाठ एक घडल्या आणि त्यावेळी त्यांचे वय फक्त १९ वर्षांचे होते.

शत्रूच्या सैनिकांनी

आपल्या लोकांची क्रूरपणे केलेली कत्तल त्यांना पहावी लागली एक लाखाच्यावर आपले सैनिक मृत्युमुखी पडले तर काही जीव वाचविण्यासाठी पळत सुटले. या घटनांचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला असणार. त्यामुळे नाना अबोल व गंभीर वृत्तीचे बनले असतील या घटनांमुळे नाना अबोल जरूर बनले असतील पण त्याची ईश्वरनिष्ठा कमी झाली नाही या सर्व गडबडीत आपली नित्यपुजेत असणारी श्रीशंकराची तसबीर हरवली म्हणून त्यांना चुटपुट लागली. ती तसबीर परत मिळवण्याचाही त्यांनी प्रयत्न केला पण ती मिळू शकली नाही. दोनदा शत्रूच्या हाती लागूनही बरोबरच्या मंडळींना सैनिकांनी मारले व त्यांना सोडले तेव्हा परमेश्वरानीच आपल्याला सांभाळले असे त्यांना वाटले. पानिपतवरुन परत येताना नानासाहेब पेशवे त्यांना भेटले. टोक्यास नानांची व श्रीमंतांची पुन्हा भेट झाली तेव्हा नानांनी, पत्नीची व त्यांची भेट झाली या साऱ्या घटना परमेश्वराच्याच कृपेने झाल्या असे त्यांनी मानले भयानक प्रसंगातही त्यांची ईश्वरनिष्ठा ढळली नाही, उलट आपल्या हातून परमेश्वराला काही कार्य करवून घ्यायचे आहे असा नानांनी विचार केला.

**नानांनी बांधलेली देवालये –**

१. पुण्यात बेलबागेत विष्णुमंदिर

२. मूळ गाव वेळास येथे काळभैरवाचे देवालय

३ खोपवलीस श्रीशंकराचे मंदिर

४. मौजे आवळस पेटा पौड येथे एक तलाव, तलावाजवळ भीमाशंकरचे देवालय हे देवालय त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने पूर्ण केले.

५. वाई जवळ मेणवली येथे कृष्णेच्या तीरावर एक घाट अमृतेश्वराचे व लक्ष्मी वासुदेव अशी दोन मंदिरे बांधली.

नानांनी स्वखर्चाने ही देवालये बांधली तसेच रयतेच्या सोईसाठी इतरही खूप बांधकाम केले.

## ३. मसनदीचा मान पेशवाईचा अभिमान

पेशव्यांचे राज्य आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा इंग्रज वारंवार प्रयत्न करत असत पण नाना दक्षतेने राहून त्यांचे प्रयत्न हाणून पाडत १७९९ मध्ये दुसरा बाजीराव पेशवा असताना आधीच्या सर्व घटनामुळे मानाचे राजकारणा पूर्ण उतरले होते. तरीही पेशवाईचा अभिमान त्यांनी मृत्यू येईपर्यंत सोडली नाही.

इंग्रजांनी आपली पगारी मैत्री पेशव्यावर लादण्याचा प्रयत्न १७९९ मध्ये पुन्हा एकदा केला. टिपूशी युध्द करताना तुम्ही आम्हास मदत करा अशी मागणी इंग्रजांनी केली होती. नानांनी ती मान्यही केली होती व परशुरामभाऊ किंवा त्या ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंत यांचे बरोबर पेशव्यांची फौज पाठवण्याचे ठरले. उद्देश असा की. युद्ध जिंकल्यानंतरचा फायदा टिपूने पेशव्यांचा बळकावलेला मुलुख परत मिळवता येइल पण पेशवा बुडता निघाला तर काय करणार ? नावाडीच नाव बुडवायला लागला तर कोण काय करू शकेल ? बाजीरावाने आधीच टिपूकडून १६ लक्ष रूपये घेतले होते व आपली फौज पाठवण्याकडे दुर्लक्ष केले. इंग्रजांनी आपल्या बळावर ते युध्द जिंकले तर बाजीरावाने इंग्रजास नामानी फौज पाठवण्यास नकार दिला म्हणून आम्ही फौज पाठवू शकलो नाही हे कारण पुढे केले असा विश्वासघातकी स्वामी असूनही बाजीरावास कठीण समयी मदत केली. मसनदीचा मान राखायची म्हणूनच इंग्रजांचा नवा प्रयत्न काय होता हे पाहू इ स १७९९ च्या नोव्हेंबर महिन्यात चौधे इंग्रज आले व त्यानी श्रीमतांना विनंती केली. आम्ही आमच्या बादशहाने फर्मान तुमच्यासाठी आणले आहे. त्याचा तुम्ही गौरवपूर्वक स्वीकार करावा तो असा १ फर्मानाचा स्वीकार करण्यासाठी श्रीमतानी उद्दाम डेरे या ये दरबाराचा समारंभ व्हावा २ आम्ही फर्मान घेऊन येऊ तेव्हा श्रीमंतांनी आम्हास सामोरे यावे. ३. मागे मुतलखीच्या वेळेस फर्मानवाडीचा समारंभ झाला होता तसा याही वेळेस व्हावा ४ आम्ही फर्मान दरबारात हजर करू तेव्हा सन्मानार्थ श्रीमतानी दरबारात उभे राहून ते स्वीकाराजे ५ या प्रसंगानिमित्य खुशालीच्या शंभर तोफा वाजवाव्यात.

या प्रसंगी कसे वागावे. काय करावे, कशी अक्कल लढवाची है बाजीरावास उमगेना व डोकेही चालेना ज्या नानांची त्याने वारवार पंचाईत केली. त्यांना

पदावरून दूर करून त्यांची संपती लुबाडण्याचा त्यांना कैद करण्याचा ठार मारण्याचाही कट केला त्याच नानांकडे ते पत्र घेऊन आम्ही कसे वागावे, काय उत्तर द्यावे हे विचारता झाला.

नानांना आता राजकारणात व बाजीरावाच्या कानाची अजिबाद आस्था उरली नव्हती. तरीही राष्ट्राचा अभिमान वाटत होता म्हणून त्यानी बाजीरावास उत्तर तयार करून दिले असे...

नानानी इंग्रजांचा कावा बरोबर ओळखला व पाक कलमी पत्राला पाच कलमी उत्तर तयार केले.

१. कलम १.२.३ फर्मोन घेण्याकरता मुद्दा डेरे देणे वगैरे सन्मान फक्त दिल्लीकराखेरीज पेशवे सरकार इतर कोणालाच देत नाहीत मागे माधव बल्लाळ यावेळी असेच विलायतच्या बादशहाचे फर्मान घेऊन सॉल्टिन आला होता त्याने नेहमीच्या दरबारात आणून दिले. तसेच याही वेळी व्हावे. इंग्रजास वाटते तर जेव्हा श्रीमंत दरबारात जातील. तेव्हा श्रीमंतांनी उभे राहून पत्र द्यावे असे बसण्यापूर्वी इंग्रजांनी त्यास पत्र द्याये, म्हणजे झाले श्रीमंतांनी ते फक्त घेऊन वाचवण्यासाठी मुनशीच्या ताब्यात द्यावे) हवाली कराये ५ विशेष खुशालीचा समजून १०० तोफा वाजवण्यात याव्या असे इंग्रज सांगतात, पण तसे करण्याचे काहीच कारण नाही. खुशालीच्या इतर प्रसंगाप्रमाणे २० तोफा व्याजवाव्यात. या बाबतीत इंग्रजानी खूप प्रयत्न केला पण त्यांचे काही चालले नाही. नाना आपल्या मताशी पक्के राहिले आणि त्यांच्याच म्हणण्या प्रमाणे सारे काही घडून आले ता ७ जानेवारी १८००.

या नंतर थोडयाच दिवसांत १३ मार्च १८०० ला नाना स्वर्गवासी झाले. या देशभक्ताने प्रत्येक वेळी प्रत्येक बाबतीत स्वराज्याच्या प्रतिष्ठेला जास्त महत्व दिले. मृत्युच्या आधी नेपाळपासून त्रावणकोर पर्यंत विस्तीर्ण प्रदेश हिंदुच्या सत्तेखाली होता.

**इंग्रजांना खडे चारले, नाही लागू दिला थारा ।**
**भले बुध्दिचे सागर नाना, ऐसा नाही होणारा ।।**

## ४. पेशव्यांचे प्राण लाखमोलाचे

नानांनी बहु शर्थीने राज्य राखले. मराठ्यांचा दरारा हिंदुस्थानात वाढू लागला. पेशव्यांच्या मताला महत्त्व आले, प्रतिष्ठा वाढली. नानांचे भाऊ मोरोबादादा रुसले बारभाईच्या कारस्थानात आपल्याला काहीच स्थान मिळाले नाही म्हणून ते रागावले. नानांचे महत्व कमी होऊन आपले महत्व कसे वाढेल व आपला फायदा कसा होईल इकडेच त्यांचे लक्ष असावयाचे. आपल्या हाती सत्ता असावी. यासाठी मोरोबांनी प्रयत्नांची शर्थ केली. त्यासाठी अनेक कट कारस्थाने केली. लढाया केल्या. विश्वासघात करवले, नानांवर मारेकरी घातले. सैनिकात फितुर करवले, रक्ताचे पाट वाहिले त्याचीही पर्वा केली नाही. जो राज्याचे भले करत होता त्याच्या पक्षात जायच्या ऐवजी मोरोबादादासारखी मंडळी त्यांच्याविरोधी पक्षात गेली. प्रसंगी इंग्रज, निजाम यांचीही मदत घेऊन पेशव्यांवर चालून जाण्याचा विचार केला.

आपल्या हातात सत्ता असावी असे बापूंनाही नेहमीच वाटत असे त्यामुळे तेही मोरोबास सामिल झाले. यावेळी नाना पुरंदरावर होते. तेथेच बालपेशवेही होते. शिंदे व फडके सरदार दूरवर होते. नानांवर हल्ला करण्यास योग्य वेळ होती. म्हणून मोरोबा होळकरांसह पुरंदर कडे निघाले त्याआधी पुणे ताब्यात घेतले होते. आता काय करावे हा नानांच्या समोर पेच उभा राहिला. शिंदे व फडके याजकडे जावे तर ते दूर होते श्रीमंतास किल्ल्यावर एकटे टाकून कसे जाणार? तो मराठी दौलतीचा लाडका पेशवा साच्या दौलतीचे आनंदाने निधान प्राणापेक्षा जपायचे हा त्यांचा निक्षय मग काय करावे? होळकर वगैरे सरदारांत दुही माजवून हे काम ते सहज करू शकत होते.) आजच लढाई उभी करावी काय ? मग आपणासाठी राज्याचा नाश, रक्ताचे पाट वाहणार, आपल्याच माणसांचे रक्त सांडणार, आपल्यात दुही माजवणे हे योग्य नव्हे. त्यापेक्षा आपले काय होईल ते होवो. राज्याचा धनी (बाळ पेशवा) राखला पाहिजे. राज्याचे कल्याण झाले पाहिजे त्यासाठी स्वार्थत्याग करण्याचीच त्याना बुध्दि झाली अधिकार गमवावा. पड खावी हे त्यांनी ठरवले. राज्याचे काडीमात्र नुकसान न होता, रक्तपात न होता सर्व काही शांत झाले. हा मार्ग अकलेचा, धोक्याचा, खऱ्या देशाभिमानी

मुत्सद्याचा त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. नानांनी हाच मार्ग अनुसरला मात्र बोलताना बापूंवर विश्वास टाकल्याचे सांगितले.

नानांनी कबुली दिल्यावर सखाराम बापूनी मोरोबास मिळते आहे तेवढे घेऊन गप्प बसा असा निरोप दिला. नानांकडून अखत्यारीचा मान तेवढा काढून घेतला व आपल्या सल्ल्याशिवाय कारभार करावयाचा नाही असे बजावले.

''केवळ सैन्य बळावर आणि बळजबरी करून पुरंदर किल्ला व पेशवे हाती घेऊ पहाल तर चालणार नाही प्राण गेला तरी बेहतर नाना पेशव्यास तुमच्या हवाली करणार नाही. हा नानाचा निश्चय आहे. ''असे मोरोबानाही बापूनी समज देऊन सांगितले. अशा प्रकारे मोरोबांच्या प्रकरणावर पडदा पडला. नानांच्या स्वामीनिष्ठेबद्दल घरचे व दारचे शत्रू सुध्दा वावगे बोलू शकत नव्हते.

## ५. गुप्तहेर कथा

गुप्तहेर म्हणजे राज्याचे नेत्रच असतात प्रत्येक ठिकाणी राजा लक्ष देऊ म्हणेल तर ते शक्य नसते गुप्तहेरांकरवी राजा सर्वत्र नजर ठेवत असतो. राज्याचे रक्षण करत असतो शत्रूच्या गोटातील बातम्या मिळवत असतो. शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवून असतो. म्हणून तो राजा शत्रूची कारस्थाने हाणून पाडतो. ज्याचे हेर खाते अव्वल दर्जाचे असते तोच राजा उत्तम राज्य करू शकतो.

नारायणरावांच्या वधामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. सवाई माधवरावांच्या जन्मानंतर राज्यात स्थैर्य येत होते. नानांचे नाव हिंदुस्थानात गाजत होते. त्यांची प्रतिष्ठा वाढली होती ती मोरोबा व बापू यांना सहन होत नव्हती. नानांना कैद करण्याचा कट त्यांनी रचला.

मोरोबांची स्वतःची एक सैनिकी तुकडी होती नानांना नेमके कोणत्या दिवशी कैद करायचे हे नक्की ठरले. रोज रात्री १२ वाजता तोफेचा इशारा होत असे. तो इशारा झाला की नानांना त्यांच्या राहत्या घरी पकडावयाचे हे ठरले. नानाचे हेरखाते जबरदस्त होते त्यांना या कटाचा सुगावा लागला त्याचे सर्व धागे दोरे शोधून काढले. ज्यादिवशी अटक करावयाचे ठरले होती त्यादिवशी रात्री

१२ वाजता तोफ उडवणारा जो माणूस होता त्याला आधीच बोलावून घेतले आज पुरंदरावरून तोफांचे पाच आवज ऐकू आल्यावर १२ वाजताची तोफ उडव आधी नाही. असे सांगितले.

त्यादिवशी बापू मुद्दाम गप्पा मारावयास आले. नानांना कटाची चाहूल लागली आहे का हे जाणून घेण्यासाठी व नानाचा वेळ घालवण्यासाठी ते गप्पा मारत बसले आपल्याला अटक करण्याच्या कटात बापू आहेत हे नानांना माहीत होते. तरीही ते शांतपणे बोलत बसले त्यांच्या बोलण्यातून नानांना कटाची सर्व माहिती आहे हे बापूंना कळलेही नाही खूप गप्पा मारून बापू निवांतपणे परत गेले. लगेच नानांनी पालखी बोलावली व पुरंदर कडे त्वरेने गेले पालखी पोहचल्यावर तोफांचे पाच आवाज केले. ते ऐकल्यावर पुण्यातही तोफेचा इशारा झाला लगेच मोरोबांच्या सैन्यातील तुकडीने नानांच्या वाडवाला गराडा घातला. पण त्यांची फजिती झाली त्यांना वाड्यात नाना मिळालेच नाहीत व बापू आणि मोरोबाचा कट फसला याप्रमाणे नानांनी त्या दोघांवर मात केली पण सगळ्यात गंमत अशी की. या कटाचा आपल्याला पत्ता लागला होता व तो कट बापू व मोरोबा यांनी केला होता है आपल्याला माहीत होते हे नानांनी त्या दोघांना कधीच कळू दिले नाही बापूंची बुध्दिमत्ता ते जाणून होते. त्यांना दुखवून पेशवाईचे रक्षण करण्याचा आपला कार्यभाग कधीच साधला जाणार नाही हे ते ओळखून होते. म्हणून त्यांनी बापूंचे पितळ उघडे पाडून त्यांना लज्जित केले नाही, सांभाळून घेतले. या प्रसंगानातर मात्र नाना कायम सावध राहिले. नानांचे गुप्तहेर कोण होते ते बापू व मोरोबांना कधीच कळले नाही.

## ६. गुप्तहेर कथा

नानांचे व इंग्रजांचे नेहमीच डावपेच चालत. इंग्रजांवर नानांनी कधीच विश्वास ठेवला नाही. त्यांच्याशी वागताना जास्त सावधगिरी घेत. मॅलेट या वकिलाने आपल्यासाठी मुंबईहून हवे ते सामान आणण्याचा परवाना नानाकडे मागितला. बोरघाटात जकातनाके होते. तेथे सामानाची पाहणी झाल्यानंतर रोज तीन पालख्यातून सामान आणण्याची परवानगी मिळाली सामानाची पहाणी न

करताच पालख्या जाऊ द्याव्या अशी मॅलेटची इच्छा होती. या परवानगीचा दुरुपयोग होणार नाही या अटीवर नानांनी मॅलेटला सामान नेण्यास परवानगी दिली. याप्रमाणे 'काही दिवस व्यवस्थित माल येत होता आपल्याजवळ काही शस्त्रास्त्रे नसल्याने मॅलेटला असुरक्षित वाटले. त्याने पालखीतूनच बंदुका आणण्यचे ठरवले तशा सूचना दिल्या एका विशिष्ट रंगाच्या पालखीतून माल पाठवावा असे ठरले. ठरल्याप्रमाणे पालख्या आल्या नेहमी प्रमाणे पुढे गेल्या एका विशिष्ट रंगाच्या (लाल) पालखी शिवाय ती पालखी अडवली. मॅलेटने लगेच तक्रार केली. नानांची भेट घेतली. पण त्या भेटीत त्याला आपला गुन्हा कबूल करावा लागला. त्याने क्षमा मागितली मग नानांनी पुन्हा असे घडणार नाही या कबुलीवर ती पालखी सोडली जो पर्यंत पुण्याच्या दरबारी नाना आहेत तो पर्यंत इंग्रजांनी मराठ्याच्या राज्यात ठामपणे पाय रोवण्याची स्वप्ने पाहू नयेत, अशी मॅलटने डायरीत नोंद केली.

## ७. हल्ल्याच्या आधीच प्रतिहल्ल्याची तयारी

एकदा मुंबईत गव्हर्नरने व कौन्सिलने पुण्यावर स्वारी करण्याचा बेत आखला. आपल्या वकिलामार्फत सर्व माहिती जमा केली. बेत गुप्त राखावयाचा ठरले पण मुंबईत काय घडते ? तेथील कौसल व शिलेट कमिटीत काय घडते हे रोजच्या रोज नानांना कळत असे. त्यामुळे नाना प्रतिकाराची आधीच तयारी करून ठेवत मग शत्रूचा हल्ला येई व त्याचा पराभवही होत असे.

या सर्वावर कडी म्हणजे नानांचे बेत मात्र शत्रूला कळत नसत. नानांनी लढाईची ''तयारी म्हणून एक लाखाच्या वर फौज व तोफखाना तयार ठेवला होता. तरी मॉस्टिनला पत्ता लागला नाही. आता नानांची पत कमी झाली आहे. आपण आत्ताच हल्ला केला तर नाना फौजही जमा करू शकणार नाहीत असे मॉस्टिनने कळवले. त्यामुळे इंग्रज लढाई होणारच नाही झालीच तर सहज जिंकू या विचाराने पुढे आले आणि त्यांचा फार मोठा पराभव झाला.

ज्याचे हेरखाते अव्वल दर्जाचे असते तो राजा लढाई सुरु करण्याचे आधीच विजयाची वाटचाल करतो गुप्तहेकरांकरवी बातमी काढण्यात नानांची

कमाल होती त्यांच्या यशाचे श्रेय ह्या इमानी हेराकडे जाते. हरीपंत फडके, आबाजी शेलूकर, दादा गद्रे, बजाबा देशपांडे शिरवळकर, धोंडोपंत नित्सुरे, राघो गोडबोले, नारोपंत चक्रदेव, गोविदराव काळे, गोविंदराव पिंगळे, देवराव हिंगणे, त्र्यंबकपंत परचुरे इ. त्यांच्या विश्वासातील मंडळी होती. मराठी राज्याच्या उत्कर्षास या मंडळींनीच मोठा हातभार लावला होता. यातील काही मंडळी तलवारबाजीही करत. काही सावकार काही वकील तर काही मत्सुद्दी होते.

जेथे कटाचा सुगावा लागेल तेथे बातमीदार असेच. त्यांच्या बातमीचा पल्ला खूप दूर पर्यंत होता. पण बातमी जलद कळत असे. इंग्रज फ्रेंच यांचा मराठी राज्याचा जसा जसा संबंध जास्त येऊ लागला तशी नानांस कलकत्ता, मद्रास, मुंबई, पाँडेचेरी, माही इ. ठिकाणाहूनही बारीक सारीक माहिती कळत असे

हिंदूस्थानच्या बाहेर फ्रेंचच्या व इंग्रजांच्या काय काय चळवळी चालल्या आहेत इकडे नानांचे लक्ष असे. फ्रेंचाचा सरदार बुशी हा फ्रांस देशातून फौज घेऊन मॉरिशसला आला. युरोपात फ्रेंच, डच, पोर्तुगीज हे इंग्रजांवर उठले आहेत. या ही बातम्या त्यांना कळत होत्या.

## ९. हेरगिरी

हेरकथा वाचतांना सुध्दा आपल्याला उत्सुकता वाटत असते पण हेरगिरी करणे म्हणजे जीवावरचाच खेळ आहे. प्रतिक्षणी मृत्यू समोरच उभा असतो. त्याला चकवून आपले कार्य हेराला पार पाडावयाचे असते. त्यासाठी त्याला अनेक तऱ्हेची सोंगेही घ्यावी लागतात. शिवरायांचा बहिर्जी नाईक हा हर तर सगळ्यांनाच ठावूक आहे. तसेच नानाचे हेरखाते विलक्षण तयारीचे होते.

एकदा एका हुशार व्यक्तिला नानांनी योग्य त्या सूचना देऊन निजामाकडे पाठवले. अन्न पाण्याविना उपाशी मरण्याची वेळ आली आहे. मी पडेल ते काम करीन हे त्या माणसाने खाणाखुणा करून कसे बसे सांगितले. दिसावयास चांगला असलेल्या या माणसास तेथे नोकरीचे काम मिळाले. त्याच्या व्यवस्थित कामावर खूष होऊन त्याचे काम वाढवले. त्याच्यावरचा विश्वास वाढला कारण त्याला ऐकू येत नव्हते व बोलता येत नव्हते. त्यामुळे त्याच्यापासून काहीच

धोका नव्हता, तो खलबतखान्यातही साफसफाईसाठी जाऊ शकत असे. लोक त्याच्याशी सहानुभूतीने वागत. नानांना पेशव्यांपासून दूर केल्याशिवाय आपण पेशव्यांना जिंकू शकणार नाही तेव्हा नानांना मोठ्या रकमेचे व जहागिरीचे आमिष दाखवून पेशव्यांपासून दूर करावयाचे असे निजाम व विठ्ठलसुंदरने ठरवले. त्याप्रमाणे पत्र तयार करवले पण प्रत्यक्ष पत्र पाठवण्याआधीच नानांचे त्या संबंधत उत्तर आले. हे कसे घडले ? निजामास काहीच कळेना.

विठ्ठलसुंदरने याचा शोध घेण्याचे ठरवले. त्याने नव्या नोकरावर लक्ष ठेवले. त्याच्या नकळत त्याची परीक्षा घेतली, त्याला ऐकू येते हे कळले. पण नानांचा हेर जास्त हुशार निघाला. बिग फुटले आहे हे कळता क्षणीच पकडले जाण्यापूर्वीच पलायन केले, आणि नानाकडे परत आला. अश्या हुशार हेरांच्या मुळेच नानांनी प्रतिस्पर्ध्यावर मात केली व मराठी राज्य उत्तम प्रकारे सांभाळली प्रतिष्ठा वाढवली

## १०. व्यक्तिपेक्षा राष्ट्र श्रेष्ठ

कोणत्याही एक व्यक्तीपेक्षा राष्ट्र श्रेष्ठ असते. हे कोणीही मान्य करेल. पण स्वतःवर वेळ येते तेव्हा मात्र आपला स्वार्थ महत्त्वाचा वाटतो त्यावेळी व्यक्ती राष्ट्र श्रेष्ठ हे शब्द आठवत नाहीत. भाषणात जोरजोरात बोलायला हे वाक्य उत्तम आहे. नानांचे वैशिष्टय हेच की, त्यांनी आपल्या आयुष्यात असे वागून दाखवले.

''आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे हे म्हणणारा तानाजी आपल्याला माहीत आहेत. एका राष्ट्रभक्ताची दुसऱ्या राष्ट्रभक्ताशी तुलना आपल्याला करावयाची नाही त्यात एक कनिष्ठ व दुसरा श्रेष्ठ असे नसते. सगळे लोक आपल्या राष्ट्रावर प्रेम करतच असतात. अनेकांच्या सहकार्यानेच एखादी मोठी मसलत पार पडत असते तरीही असे मनात येते की, आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे असे म्हणणारा तानाजी याच्या नावे एक बोट घातले तसेच तोफांचे आवाज ऐकल्या शिवाय बाजी मरुच शकत नाही असे म्हणणारा '' बाजीप्रभू देशपांडे यांच्या नावे दुसरे बोट घातले. बचेंगे तो और भी लड़ेंगे। म्हणणाऱ्या दाजीच्या नावे बोट घातले तर पुढचे कोणाच्या नावे घालणार ? तर पुढचे बोट

नानांच्या नावाने लागेल तो प्रसंग पुढील प्रमाणे सरकारी कामाला नाना जपत दुसऱ्या बाजीरावाने नानांना लुबाडण्याचा व त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न केला तरी सुध्दा त्यांची राष्ट्रनिष्ठा राष्ट्रप्रेम कमी झाले नाही. वैयक्तिक रित्या पेशवा मनातून उतरला असून सुध्दा ते काम करतच होते. इंग्रजांशी ३ वर्षे लढत राहून एका साष्टी शिवाय सर्व मुलूख नानानी परत मिळवला. साष्टी मिळवता आली नाही याची रुखरुख मनाला लागलेली होती.

इंग्रजांकडून इतका प्रदेश मिळवला मग त्यांनी आपले मूळ गांव वेळास का परत मिळवले नाही? असा प्रश्न मनात येईल तर त्यास नानांचे उत्तर असे की, मौजे आमचा वतनी गाव आहे. तो इंग्रजाकडे कोकणांत बाणकोटखाली आहे तो सोडवून घ्यावा असे मनात होते. परंतु सरकारची साष्टी सुटली नाही मग आपला गाव सोडवून घ्यादा है उचित नाही.

नानांनी इंग्रजांच्या जवळ त्यांचे वतनी गांव वेळांस जे इंग्रजांच्याच ताब्यात होते ते मागितले असते तर इंग्रजांनी नानांस खुश करण्यासाठी लगेच तो गा परत केला असता. पण नाना इंग्रजांना पुरते ओळखून होते आपला गाव देण्याच्या मोबदल्यात भविष्यात मोठी मागणी करू शकतात वास्तव मूले कुठार या न्यायाने त्यांनी ते गाव परत मागितलेच नाही (इग्रजांना त्यानी लहानशीही फट ठेवली नाही)

## ११. स्वामिनिष्ठा व कर्तव्यनिष्ठा

आपल्याला माहित आहेच की, अहमदशहा अब्दालीने प्रचंड मोठ्या सैन्यासह हिंदुस्थानवर स्वारी केली होती. त्याच्या स्वारीचा देशावर होणारा परिणाम विचारात घेता त्याच्या परिपत्यासाठी नानासाहेब पेशव्यानी आपले बंधू सदाशिवरावभाऊ व मुलगा विश्वासराव यांच्याबरोबर प्रचंड सैन्य देऊन उत्तरेकडे पाठवले त्याच्या समवेत नाना त्यांची पत्नी व आई यांना घेऊन तीर्थयात्रेस गेले होते नाना नेहमीच सदाशिवरावभाऊंच्या बरोबर असायचे युध्दाच्या ऐन मलकीतही नामा सदाशिवरावभाऊंच्याच जवळ होते त्यांना सुरक्षित स्थळी जाण्याची आज्ञा भाऊंना केली. पण धन्यास एकटे सोडून नाना परत आले नाहीत जेव्हा विश्वासरावांना गोळी लागली तेव्हा सैन्यात गोधळ माजला आणि त्या

वर्दीत लढण्याच्या आवेशात भाऊ गर्दीत पुढे गेले व दिसेनासे झाले काहीच उपाय न सुचल्याने नाना माघारी फिरले जीव जायचा प्रसंग येऊन ठेपला तरी त्याची स्वामिनिष्ठा कमी झाली नाही. धन्याची पाठराखण करण्याच्या कर्तव्यातही त्यांनी कसूर केली नाही.

## १२. खड्र्याची लढाई – राष्ट्राची अस्मिता

खड्र्याची लढाई अर्थात् राष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी केलेले युध्द बाळाजी विधनाथ पेशव्यांनी पूर्वी बादशहाकडून दक्षिणच्या सहा सुभ्याच्या चौथ सरदेशमुखीच्या सनदा आणल्या होत्या. त्या सनदांच्या जोरावर मराठे हा हक्काचा वसूल आतापर्यंत सक्तीने घेत असत. पण पेशवाईतच भांडणे माजली आहेत. बडाळी सुरु आहे ह्याचा फायदा घेऊन निजामाने वसूल देणे थांबवले होते ह वसूल ३ कोटी रुपये इतका थकला होता. टिपूशी युध्द संपल्याने नानांनी या प्रकरणात लक्ष घातले निजामाने सर्व बाकी एकदम चुकती करावी. अस तगादा लावला. मराठयांचे दिल्लीवरचे वर्चस्व व चौथाई सरदेशमुखीच्या सनदा हे निजामाच्या पोटदुखीचे खरे कारण होते. त्याने इंग्रज व टिपू यांनाही मदतीला बोलावले होते. नानांच्या पक्षाचे शिंदे यांना फोडण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश आले नाही.

मशीर उल्मुल्क हा निजामाचा दिवाण मराठ्यांचा द्वेष करत असे. त्यानेच चौथाई सरदेशमुखीची रक्कम मराठयांना देऊ नये हा सल्ला दिला. आपण मराठ्यांचे सहज पारिपत्य करू व ते राज्य मिळवू. कारण मराठयांचे राज्य आता मोडकळीस आले आहे असा त्याने निजामास विश्वास दिला, हमी दिली. नानांवर मारेकरीही घातले पण तो बेत नानांच्या सावधपणामुळे फसला.

एक दिवस भर दरबारांत गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे या वकिलांनी निजामाकडे चौथाई सरदेशमुखीची मागणी केली. तेव्हा आम्हास हिशेब कळत नाही. खुद्द नानांनी येथे येऊन हिशेब सांगावा, तेव्हा नानांस वेळ नाही हे उत्तर वकिलांनी दिले, त्यावर दिवाणाने फडणीस व पेशवे यांची सोंगे दरबारात आणवली, काळे व पिंगळे झाल्या प्रकाराने संतप्त झाले. आमच्या

स्वामींचा अपमान तुम्ही केला आहे, त्याचे जबरदस्त परिणाम भोगावे लागतील. अशा अर्थाचे भविष्यगर्भ उद्गार त्यांनी काढले सर्व हकिकत नानांस सविस्तर कळवली. एवढे घडल्यावर मात्र नानांनी थोड्याच अवधीत लढाईची प्रचंड तयारी केली निजामाने पेशवे व फडणवीसांचा म्हणजेच मराठी दौलतीचा अपमान केला या एका मुद्दयावर प्रचंड मोठी फौज आपले जुने वैर विसरून एकत्र आली. पानिपतानंतर प्रथमच एवढी प्रचंड फौज एकत्र आली होती.

निजामही सव्वा लाख फौज घेऊन आला होता. पण त्याने ऐनवेळी वकिलामार्फत समेटाचे बोलणे केले. पण नानाच्या सर्व अटी त्याला मान्य नव्हत्या मग युध्दाला तोंड द्यावे लागले निजामाचा प्रचंड पराभव झाला. त्याने शरणागती स्वीकारली मशीर उल्मुल्कला मराठ्यांच्या स्वाधीन करणे यासह सर्व अटी त्याने मान्य केल्या.

मराठ्यांचा सर्वात बलिष्ठ सेनापती आणि सरदार महादजी शिंदे निवर्तले होते, तरीही नानांनी सेना सागर दौलतीच्या प्रेमाखातर जमवला नानांची अद्वितीय  बुध्दिमत्ता आजवर कधीही नसेल इतक्या प्रखरतेने तळपली. आपल्या लोकांवरील त्यांचे वर्चस्व पूर्णपणे निदर्शनास आले. नेहमी तेढीने मराठा नानांच्या चातुर्याने एकरूप झाले खर्ड्याची लढाई हा नानाच्या उत्कर्षाचा कळस होता.

## १३. नानांची सावधानता

राजकारणी माणसाला सचैव सावधगिरीने वागावे लागते. आपल्यातील प्रत्येक व्यक्ती पारखून जवळ करावी लागते. घरची नोकरचाकर मंडळी त्याला अपवाद नसतात. इतके असूनही आपल्या कामकाजात गुप्तता ठेवावी लागते. त्याप्रमाणे नानांचे वर्तन असे, त्याचा पत्र व्यवहार खूप मोठा होता. त्यांच्या पत्र व्यवहारातून ते कधीही लेखी पुरावा सापडल्याने दोषी ठरले आहेत असे घडले नाही संभाषण चातुर्यही त्यांच्याजवळ होते. त्यामुळे समोरच्या व्यक्तीवर त्याची छाप पडत असे. नाना व परशुरामभाऊ यांचे वाकडे आले तेव्हा पटवर्धनाच्या कारकुनाने एका पत्रात भाऊस नाना विषयी मजकूर कळविला होता तो पुढील प्रमाणे आहे. मुख्य गोष्ट श्री राजश्री नानांचे बोलणे कोणते समयी

कसे होईल याचा भरवसा नाही सारा दिवस बोलत असता दस्तऐवज बोलण्यात सापडावयाचा नाही या चाली बोलावयाच्याच आहेत। काम लागले असता साखरेपेक्षा गोड बोलावयाच्याच आहेत. काम लागले असता साखरेपेक्षा गोड बोलावयास उशीर नाही. काम जाहले नंतर त्या गावचे देखिल नव्हते येथील विचार असा आहे.

## १३. दुहेरी राजकारण

राजकारण सांधताना शत्रूला पेचात पकडण्यात नाना चतुर होते नाना स्वत युध्द करत नसूनसुध्दा युध्द करवत होते व त्यांना हवे तेव्हा थांबवू शकत होते साधे डावपेच सर्वचजण खेळतात पण नाना दुहेरी डावपेच टाकण्यातही चतुर होते त्यावेळी शब्दाचे फासे से टाकत असत. त्यांचे दुहेरी डावपेचाचे नमुने बघु

१. इंग्रजाचा वकील पेशव्यांच्या दरबारात ठेवायला मान्यता नानांनी दिली, त्याचवेळी चर्चेत बराच काळ घालवला ही चर्चा चालू असतानाच फ्रान्सच्या वकिलाशी चर्चा व भेटी चालू ठेवल्या त्यांना इंग्रजांच्या वाढत्या पायबंद घालावयाचा होता नानांनी इंग्रजाना असे भासवले की, सत्तेला रॉवेलियर सेंत लूबिन हा फ्रेंच व्यापारी आहे, वकील नव्हे, पण इंग्रज वकिलापेक्षा फ्रेंच वकिलाची म्हणजेच व्यापाऱ्याची जास्त बडदास्त ठेवली. त्याच्याशीही चर्चा करत राहिले. गोरोबांशी फ्रेंच व्यापाऱ्याविषयी बऱ्याच गप्पा मारल्या. व्यापाऱ्याविषयी इंग्रज नक्कीच मोरोबांकडे चौकशी करतील अशी त्यांची खात्री होतीच. नेमके तेच घडले. इंग्रज व मोरोबा यांची मैत्री असल्याने त्यांनी मोरोबाकडून माहिती काढण्याचा प्रयत्न कोला मोरोबानेही सेंट ल्युबिन हा व्यापारी असल्याचा निर्वाळा दिला. यात नानांनी मोरोबा व इंग्रज या दोघांना चकवले, सेंट ल्युबिन बद्दलचा आपला हेतू गुप्त ठेवला त्याच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आणि मदत घेऊन येण्यासही सुचवले. फ्रेंच वकिलाला निरोप दिला (इंग्रज व फ्रेंचात युध्द लावून देऊन आपला फायदा करून घ्यायचा त्यांचा बेत असावा) आंतरराष्ट्रीय स्तरावर इंग्रज-फ्रेंच याचा शांतता करार झाला म्हणून

ही खटपट वाया गेली. अन्यथा वेगळा इतिहास घडला असता.

२. अधिकाराची हाव असल्याने मोरोबा नानांच्या विरोधात नेहमीच उभा असावयाचा मोरोबा पेशव्यांच्या फायद्यापेक्षा स्वतःच्याच फायद्याचा विचार करावयाचा म्हणून प्रत्येक वेळी वेगवेगळी खेळी खेळून म्हणजे कधी अधिकार सोडून, कधी कमी अधिकाराची जागा हाती घेऊन, कधी त्याच्या पक्षाचे लोकात फितुरी घडवून तर कधी सपशेल माघार घेऊन तर कधी त्याच्याशी युध्द करून पण शेवटी आपल्याला हवे तेच घडवत असत, मोरोबाने स्वार्थी स्वभावामुळे राज्याच्या हिताची चिंता केली नाही व नाना एकही दिवस मराठी दौलत विसरले नाहीत.

३. शिंदे व नाना यांच्यात मैत्री होती पण अधून मधून ते विरोधात उभे राहत असत त्याला कारण मधूनच शिद्यांना आपण पुण्यात राहून कारभारीपद सांभाळावे असे वाटत असे आपले वर्चस्व आपला शब्द अतिम शब्द असावा असे वाटे महत्त्वाची गोष्ट अशी की, ते दोघे एकमेकांच्या सर्वनाशाची इच्छा कधीच करत नसत पेशव्यांवर शिंदे व नाना यांचे दोघांचेही प्रेम होते.

नाना व शिंदे यांची भांडणे होताच गोष्टीचा त्या दोघांनी फायदा घ्यायचा ठरविला कारण त्यांना हिंदुस्थानातील सर्व प्रकारच्या आव्हानांना तोंड देण्याची तथारी करावयाची होती त्यासाठी थोडा वेळ हवा होता म्हणून त्याची पुढील डाव खेळला प्रथम त्यांनी त्यांचे बिनसले आहे असे दाखवण्यास सुरुवात केली. हळूहळू लोकांचा यावर विश्वास बसला. शिंदेनी मुंबईच्या वकिलाकडे इंग्रजांशी संधान साधले. नानांना सत्तेपासून दूर करावयाचे आहे. मला मदत करा असे सांगितले इंग्रजांना आनंद झाला त्यांनी मदत देण्याचे कबूल केले. मग मदतीच्या अटी ठरवण्यात मुद्दामच वेळ काढला तसेच नानांनी कलकते कर इंग्रजांशी मदतीची बोलणी करण्यात वेळ काढला. शिंदे गेल्यावर आपण एकटया नानांना पराभूत करू ह्या आनंदात कलकत्तेकर इंग्रज व नाना सत्तेपासून दूर होणार म्हणून मुंबईकर इंग्रजांना आनंद झाला व इंग्रज बेसावध झाले. लढाईच्या तयारीला व इतर कारस्थाने मोडायला नानांना व शिद्यांना वेळ मिळाला मदतीचे करार कधी पूर्ण झालेच नाहीत. उलट इंग्रजांशी युध्द झाल्यास तयारी म्हणून नानांनी निजाम,

हैदर अली, होळकर, नागपुरकर भोसले, मोगल बादशहा शिवाय सिद्दी, पोर्तुगीज डच इ. छोटया सत्ताही आपल्याकडे वळवून ठेवल्या. एवढे लोक एकत्र आलेले पाहून हेस्टिंग्ज चकित झाला कारण नानांचे शत्रू व मित्र एकत्र आलेले त्याने पाहिले. इंग्रज मराठे यांच्यात नानांना हवा तसा तह त्यांनी करण्यास लावला. यालाच सालबाईचा तह म्हणतात.

मराठी सत्तेला आपण सहजासहजी नमवू शकणार नाही हे इंग्रजांच्या लक्षात आले नानांच्या संघटना कौशल्याचीही कल्पना आली.

## १४. नाना प्रतिस्पर्ध्याशी कसे वागत..

योग्य वेळीच कार्य साधावे लागते, अन्यथा हेतू सफल होत नाही. कोणत्याही राज्याला दोन प्रकारच्या लोकांपासून धोका असतो एक प्रकार म्हणजे क्रूरपणे, सरळ सरळ लोकांची कापाकाप करत सुटतात. जाळपोळ करतात. अशा अतिरेक्यांना नानांनी सरळ देहान्त शासन केले. दुसरा प्रकार म्हणजे राज्यातील मान्यवर लोक जे राज्याचे अंतस्थ शत्रू असतात, काही पदाधिकारीही असतात. काही वेळा त्यांच्या बुध्दिचा उपयोग होतो काहीवेळा नुकसान सोसावे लागते.

त्याच्यावरील गुन्ह्याची खात्री पटल्यावर नाना त्यांना नुसते निष्प्रभ करत, सामर्थ्यहीन करत. पण कैद केल्यास शारीरिक पीड़ा देत नसत या बाबतीत सखाराम बापू बोकिल यांचे उदाहरण पाहण्यासारखे आहे.

सखारामबापू बोकिल से ही पेशवाईतील एक ज्येष्ठ एक उच्च पदाधिकारी, मुत्सद्दी, अनुभवी राजकारणी होते निरनिराळे डावपेच लढवण्यात तरबेज नारायणराव पेशव्यांच्या खुनाचा त्यांनाही धक्का बसला होता. बारभाईच्या कारस्थानात बापू प्रमुख होते पण एकच गोष्ट वाईट होती ती म्हणजे ते शब्दाचे पक्के नव्हते. सतत पक्ष बदलत असत. मनाने चंचल होते. पैशाचे लोभी होते. म्हणून लोक त्यांचे पासून चार हात दूरच असायचे. राज्यकारभारात ते ही पदाधिकारी होते. म्हणून नानांचा व त्यांचा रोजच संबंध येत असे. नाना त्यांच्याशी जमवून घेत नानांना जो मान मोठेपणा मिळत असे तो बापूंना

सहन होत नसे. नानांना एकटे पाडणे, कैद करणे अशी कारस्थाने मोरोबाच्या साथीने त्यांनी केलेली होती. नानांचे महत्त्व कमी झाले नाही उलट सवाई माधवरावाने शिंदे यांना नाना माझे उजवे हात आहेत जसे सांगितले होते. उलट पक्षी पेशव्यांना जर मी नको असेन तर मी सर्व सोडून काशीयात्रेला जातो असे म्हणण्याची नानांची हिंमत होती.

सखाराम बापूंच्या हातची फितुरीची पत्रे हाती मिळाली तरी ती दाखवण्याची योग्य वेळ आली त्याचवेळी ती त्यांनी शिंदे यांना दाखवली शिंदे यांच्या मदतीने नानांनी बापूना अटक केली वारंवार अधिकारी बदलण्यास सांगितले पण त्यांच्या खाण्यापिण्याची, वस्त्राची, औषधाची व्यवस्था करण्यास विसरले नाहीत. त्यांना कैद करण्यामागे राजकारणात त्यांनी त्रास देऊ नये एवढाच हेतू होता.

स्वराज्याला ज्याच्यापासून त्रास आहे त्या प्रत्येकास त्यांनी शासन केले, पण त्यांच्या वर्तनात जुलूम  वैयक्तिक आकस, वैर वा जातीद्वेष कोठेही नाही.

## १५. पाऊलखुणा

पाऊलखुणावरून नाना माणसाची पारख करत असत त्या माणसाचा स्वभाव, त्याची हुशारीसुध्दा ओळखत एकदा नाना सरदार रास्ते यांच्याकडे गेले असता त्यांना पाऊलखुणा जमिनीवर दिसल्या त्या काळजीपूर्वक पाहिल्या असता नानांनी रास्तेंना त्या पाऊलखुणा कोणाच्या आहेत त्याचा शोध घेण्यास सांगितले. त्या खुणा बाळाजीपंत नातू यांच्या आहेत, हे कळले. हा माणूस भाग्याचा आहे. पाऊल खुणा बाहेर जाण्याच्या होत्या म्हणून धन्यास धोका संभवतो, असे सांगितले.

पुढे नानांना गुप्तहेराची गरज होती. त्यावेळी सरदार रास्ते यांनी बाळाजी नातूंना पाठवले. तो निजामाकडे गेला व अवघड कामगिरी यशस्वी रित्या पार पाडली. शत्रूच्या हाती न सापडता परत आला. ही त्याची हुशारी झाली.

नानांच्या मृत्यूनंतर हा बाळाजीपंत नातू ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीला राहिला कालांतराने एलफिंस्टनच्या विश्वासातील व्यक्ती बनला. यानेच इंग्रजांच्या

नोकरीत राहून त्यांचा झेंडा शनिवारवाड्यावर फडकवला असे त्या व्यक्तीबद्दलचे नानांचे भविष्य खरे ठरले.

## १६. परीक्षा

आपल्याकडे कामाला जो माणूस घ्यावयाचा तो कामाला योग्य आहे की नाही याची पारख केल्याशिवास ती व्यक्ती कामावर ठेवली जात नसे. ही परीक्षा वेगवेगळ्या पध्दतीने घेतली जात असे. परीक्षेचा प्रकार पहा कसा आहे तो, एकदा एक माणूस नानांचेकडे नोकरी मागण्यासाठी आला तो माणूस हुशार व तरतरीत वाटला त्याला नोकरीवर ठेवावे असे नानांस वाटले. त्यांनी त्याला परत भेटीला बोलावले, तो माणूस बरोबर वेळेवर आला. खूप वेळ त्याने वाट पाहिली. त्याला त्यादिवशी तसेच परत पाठवले अशा त्याच्या दोन तीन फेऱ्या झाल्या त्याला परत भेटीची वेळ दिली. तो माणूस बरोबर दिलेल्या वेळी आला. तो आला तेव्हा नाना समोरच बसले होते. नानांच्या जवळ एक छोटी पेटी मोहरबंद करून ठेवलेली होती. नाना त्या पेटीकडे एक टक पहात होते. त्या माणसाचेही कुतुहल जागे झाले, पण तो गप्प बसला अचानक नानांनी ती पेटी, एक मोहरबंद लखोटा त्याच्याजवळ दिले चासचे सावकार शंकरशेट यांचे जवळ देण्यास सांगितले त्या माणसाजवळ मोहरबंद करण्याचे सामनही देऊन ठेवले चासेला जात असताना, त्या पेटीत काय असेल हाच एक विचार त्याच्या मनात होता. त्या पेटीची मोहर तोडून वस्तू पहावी, परत पेटी मोहोरबंद करावी म्हणजे कोणासही कळणार नाही हा विचार त्याच्या मनात आला त्याला अगदी चैन पडेना. शेवटी त्याने ती पेटी उघडली. त्या क्षणी पेटीतून एक साप बाहेर आला व रानात गेला.

त्या व्यक्तीला आपल्या उत्सुकतेवर मात करता आली नाही. तो त्याच्यावर सोपवलेले काम करू शकला नाही. त्याची परीक्षा पाहण्यासाठीच सारा बनाव रचलेला होता.

## १७. समसमा संयोग की जाहला

नानांना पांढरा रंग आवडत होता. ते नेहमी पांढरेशुभ्र वस्त्र वापरत असत. घरातील बैठकही पांढऱ्याशुभ्र चादरी व आभ्रे यांनी सजवलेली असे चादरीवर एकही सुरकुती त्यांना आवडत नसे. त्यांची पांढऱ्याशुभ्र रंगाची आवड, स्वच्छता टापटीप या विषयी एक सुंदर कथा आहे.

एकदा नाना दाजी पटवर्धन यांचेकडे जेवावयास गेले होते. पांढऱ्या शुभ्र चादरी चालून बैठक सजवली होती. नानांचे मन प्रसन्न झाले बैठकीवर बसल्यानंतर एका लहानशा काळ्या डागाकडे सारखी नानांची नजर वळत होती तो लहानसा डाग त्यांच्या नजरेला खुपत होता. दाजीसाहेबांच्याही ते लक्षात आले

थोडयाच वेळात भोजन झाल्यावर परत विडा खाण्यास नाना त दाजीसाहेब बैठकीवर बसले. गप्पा मारता मारता नाना त्या डागाची जागा बघत होते, तेव्हा तो डाग दिसेना. नानांची नजर डाग शोधत होती पण डाग दिसत नव्हता, दाजीसाहेबांच्याही लक्षात आले ते काहीच बोलले नाहीत, ते मिश्किलपणे हसत होते. विडा खाताना नानांच्या एकदम लक्षात आले. क्षणात त्यांच्या चेहयावर हसू पसरले नाना काहीच बोलले नाहीत. दाजींनी ते पाहिले तरी ते काहीच बोलले नाहीत. दाजींनी विड्याला चुना लावताना ते बोट बरोबर त्या डागावर पुसले होते.

नानांनी अत्यंत प्रसन्न मनाने, आपल्या हातातील पोहची काढून दाजींना भेट दिली. दाजीसाहेबही सर्व काही उमगले व त्यांनी भेट स्वीकारली. प्रेमाने वापरली (पोहची हातात घालावयाचा एक दागिना)

## १८. गोष्ट बाहुल्यांची

फार पूर्वीपासून सत्ताधीशाला भेटावयास जाताना काहीतरी नजराणा सादर करावयाची पद्धत होती, पुणे दरबारही ह्या पध्दतीला अपवाद नव्हता पेशव्यांनाही सदिच्छापूर्वक भेटी दिल्या जायच्या. नंतर त्या भेटी सुरक्षित ठेवण्यासाठी नानांकडे सुपूर्त केल्या जात असत.

एकदा एक प्रवासी परदेशातून पेशव्यांच्या दरबारात आला. तो कारागीर

होता. त्याने पेशव्यांच्या समोर अगदी सारख्या दिसणाऱ्या तीन बाहुल्या ठेवल्या मिश्किलपणे हसत म्हणाला. पेशवे सरकार आपल्या दरबाराची ख्याती सर्व दूर पसरली आहे. ती ख्याती योग्य आहे की नाही हे पहाण्यासाठी मी आलो आहे पेशव्यांनी हसून मान डोलावली. तो प्रवासी पुढे म्हणाला. ह्या बाहुल्या तयार करण्यासाठी मला एक वर्ष लागले. त्या अगदी सारख्या आहेत, इतक्या की, जणुकाही तीन जुळ्या बहिणीच. परंतु त्या प्रत्येकीमध्ये थोडा फरक आहे. आपल्या दरबारातील विद्वानांना माझा प्रश्न आहे की, प्रत्येक बाहुली इतर दोन्ही बाहुल्यापेक्षा वेगळी आहे ती कशी ते सांगावे

सगळ्यांच्या नजरा नानांकडे वळल्या. पेशव्यांनी त्या बाहुल्या नानांकडे दिल्या नानांनी बाहुल्याचे कोडे सोडवण्यासाठी एका दिवसाची मुदत मागितली प्रवाशाने आनंदाने होकार दिला. दुसऱ्या दिवशी वेळेवर दरबार भरला. नानांचे उत्तर ऐकण्यासाठी दरबार गच्च भरला होता कारण पुण्याची विद्वता पणास लागली होती ह्या गंभीर वातावरणात फक्त दोन व्यक्ती निवांत होत्या. एक प्रवासी त्याला खात्री होती की, आपले कोडे कोणालाही सोडवता येणार नाही. आणि दुसरी व्यक्ती म्हणजे पेशवे, ज्यांना नानांच्या बुध्दिमत्तेबद्दल पूर्ण खात्री होती.

नाना तीनही बाहुल्या समोर ठेवून बोलावयास लागले. ते म्हणाले, मी सुरुवातीसच सांगतो की. प्रवाश्याने माझी थोडी दिशाभूल केली. त्याने सांगितले की, या तीन बाहुल्यामध्ये अगदी थोडा फरक आहे. पण माझ्या म्हणण्याप्रमाणे या तीनही बाहुल्यातील फरक फार मोठा व गंभीर स्वरूपाचा आहे.

हे बोलत असतानाच त्यांनी एक बाहुली हातात घेतली व दुसऱ्या हाताने एक काडी त्या बाहुलीच्या कानात घातली ती काडी त्या बाहुलीच्या तोडातून बाहेर आली. ह्या बाहुलीसारखी माणसे कधीही विश्वास ठेवण्याच्या लायकीची नसतात कारण ह्या व्यक्ती जे ऐकतील ते केव्हाही कुठेही बोलतात. ह्या व्यक्ती धोकादायक असतात. नंतर दुसऱ्या बाहुलीच्या कानांत काडी घातली ती काडी दुसऱ्या कानातून बाहेर आली. अशा प्रकारची माणसे एका कानाने ऐकतात दुसऱ्या कानाने सोडून देतात. त्यांच्याजवळही काही बोलण्यात अर्थ नसतो.

कारण ही माणस जे ऐकतात ते विसरुन जातात. आपल्याकडे म्हण आहे, नळी फुंकली सोनारे इकडून तिकडून गेले वारे.

नाना थोडावेळ थांबले आणि त्यांनी तिसरी बाहुली हातात घेतली. त्यांनी एक काडीच्या कानांत घातली ती काडी कोठूनही बाहेर आली नाही. नाना म्हणाले, या बाहुलीप्रमाणे असणाऱ्या व्यक्ती सभ्य व्यक्ती असतात. ही बाहुली सर्वोत्कृष्ट आहे. कारण अशी माणसं शहाणी, विश्वासू व अनुभवी असतात. ती जे ऐकतात ते स्वतः जवळच ठेवतात. अशी माणस म्हणजे रत्नच आहेत.

नानांचे बोलणे ऐकल्यावर त्यांनी प्रवाश्याकडे पाहिले. तो आश्चर्याने थक्क झाला होता. क्षणभराने त्याने मान डोलावली व आपला पराभव मान्य केला तो म्हणाला माझी कल्पना होती त्याच्यापेक्षा कितीतरी पट नाना बुध्दिमान आहेत. बाहुल्या मी बनवल्या खऱ्या पण त्यांच्यामधील फरकाचा खरा अर्थ मलाच आज कळला.

पेशव्यानी हसून मान डोलावली तर दरबारातील मंडळींनी नानांच्या विद्वते समोर आनंदाने मान झुकवली.

***

## घाशीराम कोतवाल प्रकरणी एक विचार

नाना हा इंग्रजांच्या डोळ्यात सलणारा शत्रू होता. राघोबाच्या पक्षाच्या लोकांनी आणि इंग्रजांनी पध्दतशीरपणे नानांचे चारित्र्यहनन चालविले होते. ललितागौरीशी व्यभिचार आणि तिला या जगातून नाहीशी करणे, हे नानांवरील आरोप बिनबुडाचे आहेत, असे श्रेष्ठ इतिहासकार सेतुमाधवराव पगडी यांनी म्हटले आहे. जे घडलेच नाही त्याचे स्पष्टीकरण देणार कसे ?

अगा जे घडलेची नाही.

तयाची वार्ता पुससी कायी ?'

घाशीराम कोतवाल ह्या प्रकरणातून नानांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले गेले. नानांचा त्या घटनेशी संबंध हा केवळ सरकारी कामकाजातून येऊ शकतो

तेवढाच होता. एखाद्या व्यक्तीचा पराभव करता येत नसेल तेव्हा त्याचे शत्रू त्या व्यक्तीच्या चारित्र्य हननाचा मार्ग अनुसरतात. ही घटना घडली तेव्हा नाना आकंठ राजकारणात बुडालेले होते. पेशव्यांचे, स्वराज्याचे, स्वतःचे संरक्षण ह्या गोष्टी कायम सावध राहून कराव्या लागत होत्या.

नानांचा पाडाव करून इंग्रजांना त्यांची सत्ता दृढमूल करता आली नाही उलट सर्वच ठिकाणी इंग्रजांचा पराभव झाला, त्यामुळे सूडबुध्दि आणि हीन मनोवृत्ती यामुळे इंग्रजांनी त्यांच्या विषयी घाणेरडे आरोप केले. इंग्रज शत्रूच होते पण स्वकीयांनीही त्याच आरोपांची उजळणी करावी ही शरमेची गोष्ट वाटते माकडांना रत्न काय अन् दगड काय सारखेच!

नाना व पेशवे यांची सोंगे दरबारात आणणाऱ्या निजामाचा सूड शिंदे भोसले, पटवर्धन, फडके इ. स्वराज्यनिष्ठ मराठा सरदारांनी खर्ड्याच्या लढाईत उगवला व निजामाला शासन केले. पण ते १७९५ साल होते. आता जमाना बदलला आहे. ऐतिहासिक थोर व्यक्तींच्या विषयी कोणीही उठतो काहीही खरडतो, विकृत स्वरुपात रंगमंचावर सादर करतो. अश्या करंट्यांना काय म्हणावे।

नाना नसते तर काय झाले असते! नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर (१७७३) इंग्रजांनी रघुनाथरावाला सहाय्य करून लखनौच्या शुजाउद्दौल्या प्रमाणे आपले मांडलिक बनवले असते. वसईचा तह महाराष्ट्राच्या माथ्यावर १७७५ मध्येच बसला असता. महादजी शिंदे यांचे पराक्रम १७८३ च्या पुढे सुरु झाले ते खरडून गेले असते. नाना म्हणजे पेशवे नव्हते कीं, योध्दा नव्हते. ते मराठी राज्याचे फडणीस (अर्थ खात्याचे सचिव म्हणा फार तर) अशा माणसाने बावीस वर्षे पर्यंत राज्यातील फितूर, राघोबादादा, इंग्रज, निजाम, म्हैसूरकर इत्यादींचा बंदोबस्त किती कुशलतेने, मुत्सद्देगिरीने आणि चिकाटीने केला, हे पाहिले तर मन थक्क होऊन जाते. इंग्रजांना पूर्णपणे ओळखून असणारा हा एकमेव मुत्सद्दी त्यावेळी महाराष्ट्राला लाभला. हे स्वराज्यचे भाग्यच म्हटले पाहिजे – **सेतुमाधवराव पगडी.**

## नानांच्या शत्रूंचे, त्यांचे विषयीचे गौरवोद्गार

नानांच्याबद्दल त्यांच्या शत्रूंची मते काय आहेत, हे जाणून घेणे मनोरंजक आणि महत्त्वाचे आहे इंग्रजांच्या भारतातील प्रगतीच्या मार्गात नाना एक मोठा अडथळाच होते. म्हणून द्वेष करत नानांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचे कुकर्म त्यांनी केले. तरिही आपल्या मनाजवळ किवा आपल्या रोजनिशीत त्यांचेबद्दल गौरवोद्गार करवल्यावाचून राहवले नाही. टिपू, हैदर, निजाम मोंगल यांनीही नानांचे विषयी गौरवोद्गार काढले आहेत. मित्र तर काय जिवाभावाचे मिळवले होते त्यांच्यासाठी प्राणही वेचण्यास तयार होते. शत्रू त्यांचेबद्दल काय म्हणतात. ते पाहूया.

नानांच्या दीर्घोद्योगाबद्दल मॅकडोनल्ड म्हणतो–

''त्यांचा खाजगी पत्रव्यवहार नजरेखालून घालण्याची एकदा मला संधी मिळाली. तो नऊ हजार भरला. त्यांचे टिपणवजा आत्मचरित्र हे आशिया खंडातील वाङ्मयामध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरू शकेल. शिपाई बाण्याचा अभाव हे त्यांच्या व्यक्तीमत्वातील एक मोठेच वैगुण्य होय मुलकी कारभाराबरोबरच त्यांच्या अंगी लष्करी कौशल्य असते तर ते आपला स्वतंत्र राजवंश स्थापू शकले असते'' नानांच्या मुलकी कारभाराबद्दल लिहिताना डफने 'मराठी राष्ट्राने दिलेला एक अत्यंत बुध्दिमान पुरुष' असे त्याचे वर्णन केले आहे.

नाना जिवंत असेपर्यंत मराठ्यांच्या सत्तेचा जो वचक होता तो त्यांच्या मृत्युनंतर परकीय राज्यकर्त्यांना क्वचितच अनुभवायला मिळाला'' असे ब्राऊनने यथार्थ हेतूने म्हटले आहे.

नानांच्या कारकिर्दीबद्दल लिहिताना **एल्फीस्टन म्हणतो** की, ''पेशव्यांच्या सत्तेचा ऱ्हास नानांनी हयात असेपर्यंत थोपवून धरला.''

**विल्यम टोन म्हणतो.** ''नानांनी आपल्या कारभाराच्या दीर्घ काळात परस्पराविरूध्द किंवा परस्पर विसंगत अशा साऱ्या शक्तींना एकत्र आणून राष्ट्र उभारणीच्या महत्कार्यात त्या सर्वांना गुंफण्याचे मौलिक कार्य केले.''

नानांच्या योग्यतेबद्दल अत्यंत समर्पक शब्दांत लंडनहून प्रसिध्द झालेल्या **एशियाटिक ॲन्युअल जर्नल** मध्ये अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख आढळतो ''हिंदुस्थानच्या नव्हे, तर कदाचित जगाच्या राजकीय रंगमंचावर नानापेक्षा अधिक कर्तृत्वाच्या व्यक्ती क्वचितच आढळतील. ''नानांची मुत्सद्देगिरी तोलता येईल अशी व्यक्ती हिंदुस्थानात

सापडणे विरळ, मग त्यांच्यावर मात करण्याची बातच सोडा.

जेव्हा इंग्रज मराठा युध्दाला तोंड लागले, तेंव्हा नानांच्या कर्तबगारीची खरी कसोटी लागली. मराठ्यांनी इंग्रजांविरुध्द मिळविलेल्या अपूर्व यशाबद्दल लिहिताना दिल्लीचा मोगल बादशहा म्हणतो.

मराठ्यांच्या दरबारातील राजद्रोहाच्या वातावरणात, पेशवा अल्पवयीन असता, गेल्या आठ वर्षात नाना होते म्हणूनच इंग्रजांना पुरुन उरले. एखाद्या मसनदीवर ईश्वराची कृपा असली तर नानांसारखा एखादा कारभारी सरदार किंवा राजकारणी त्यास लाभतो एऱ्हवी नाही. ''.

मराठ्यांच्या कडव्या शत्रूने हैदरने एका पत्रात म्हटले आहे.. ''नाना मोठे दूरदर्शी आणि खंबीर मनाचे आहेत. आपल्या वचनाचे ते पक्के आहेत आणि वचनास तितकेच प्रामाणिक आहेत. इंग्रजांची कूट नीती आणि कपट कारस्थाने ते पुरेपुर जाणून आहेत. त्यांच्या बहाण्याला ते चुकूनही बळी पडणार नाहीत.''

नाना व महादजी शिंदे यांच्यात मतभेद असले, तरी त्यांच्या मनांत एकमेकांबद्दल बंधुभाव ही नांदत होता एकदा शिंदे अडचणीत आले होते तेव्हा नानांनी लगेच मदत पाठवली.

खालील शब्दात त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. ''आमच्या अगदी गरजेच्या वेळी आमचे सन्माननीय बंधू नानांच्या खेरीज, दुसरे कोणीही आमच्या मदतीस आले नाही. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी मोठ्यांच्या कार्यातून मोठेपणाच प्रत्ययास येणार.''

नाना अत्यंत नियमित होते. प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी व काटेकोरपणे करत असत. थोडीशी विश्रांती व सतत उद्योग करत होते. पत्र लिहिण्याचा त्यांना छंद होता. त्यांच्या फडातील कामकाजही शिस्तबध्द होत असे. वर्डस्वर्थच्या शब्दांत सांगायचे तर,'' नानांनी अंदाधुंदीच्या या काळात निसर्गाकडून प्राप्त झालेला उत्कट आणि उर्ज:स्वल मनाचा वारसा नेहमीच जपला होता.''

''जोपर्यंत पुण्याच्या दरबारी नाना कारभारी आहेत. तोपर्यंत इंग्रजांनी मराठयांच्या राज्यात ठामपणे पाय रोवण्याची स्वप्ने पाहू नयेत'' असे मॅलेटचे मत आहे.

*******

# बाळाजी जनार्धन भानु उर्फ नाना फडणवीस

## शकावली आणि काही चरित्र – निर्देश

| शक | इ. सन. | |
|---|---|---|
| १६६३ माघ व ।।४ | १७४२ फेब्रु. १२ | जन्म |
| १६६८ वैशाख | १७४६ एप्रिल | व्रतबंध |
| १६७३ मार्ग शु। । ८ | १७५१ नोव्हें. १५ | पहिला विवाह विष्णूपंत गद्रे कन्या |
| – १६७८ | १७५६ | उत्तरेंत स्वारीवर असतां वडील जनार्दन बाबा यांचा मृत्यू |
| १६७८ मार्ग शु । । ८ | १७५६ नोव्हें. २९ | फडणविशीची वस्त्रे मिळतात. |
| १६८३ | १७६१ | गोदावरी कायगांवींतरीं घाट बांधला |
| १६८४ मार्ग.. | १७६२ नोव्हें.डिसें. | नानाकडील फडणीसी राघोबादादांनी काढली |
| १६८५ भाद्र. व । । १३ | १७६३ ऑक्टो.५ | फडणीसीची पुनः प्राप्ती |
| १६८५ पौष | १७६४ जाने. | (पुणे) नानावाडा बांधणीस प्रारंभ |
| १६८८ | १७६६ | बेलबाग – विष्णु मंदिर (पुणे) |
| १६९० | १७६८ | नानांना मेणवली गांवचा खालसा अमंल मंत्री व प्रतिनिधी कडून मिळाला. |
| १६९१ | १७६९ | विष्णु–लक्ष्मी प्रतिष्ठापना व अर्चा, बेलबाग |
| १६९६ कार्तिक | १७७४ नोव्हें. | नाना, बापू, चि.स. राव यांवर मारेकरी |
| १६९८ | १७७६ | नानास दगा करण्याची मसलत |
| १६९९ | १७७७ | नानांचे तिसरे लग्न. सावरकर गाडगीळ यांची कन्या. |
| १७०० | १७७८ | नानास व हरिपंतास दगा करावा अशी तिसऱ्यांदा मसलत. |
| १७१० फाल्गु शु । ३ | १७८९ फेब्रु २७ | नानांचे लग्न आडिवरें परांजपे कन्या |

| | | |
|---|---|---|
| १७१० फाल्गु शु । १२ | १७८९ फेब्रु २२ | नानांचे महादजींना काशीक्षेत्र सोडविण्याबाबत पत्र |
| १७११ फाल्गुन | १७९० | पुणे येथे नाना पेठ वसाहत |
| १७१३ जेष्ठ | १७९१ जून | सदाशिव पेठ हौदांत पाण्याचा नहर |
| | | भीमाशंकर मंदिर बांधणी प्रारंभ |
| १७१४ आषाढ शु. ३ | १७९२ जून २२ | (स. माधवराव, महादजी शिंदे याबरोबर) दिल्लीच्या बादशहा कडून नानांना वजिरीची फडणिशी मिळते. |
| १७१५ | १७९३ ऑक्टो. | काशीस दुर्गाघाटावर वाडा बांधण्यास आरंभ |
| १७१६ | १७९५ | काशीस कर्मनाशी नदीवर पूल–बांधणी |
| १७१८ | १७९६ | रायगड येथें सिंहासनासमोर नगारखाना |
| १७१९ | १७९७ | दत्तक पुत्र दामोदर बळवंत ह्याचा मृत्यू |
| १७१९ पौष शु ।। १३ | १९९७ डिसें. ३१ | शिंदे –मुकिरकडून नानास अटक. |
| १७२० आषाढ | १७९८ जुलै | सुटका |
| १७२० भाद्र. | १७९८ आक्टो. | शिंदे व इंग्रजाकडून पुनः अटकेचा यत्न. |
| १७२१ वैशाख | १७९९ मे | पुनः बाजीरावांकडून अटकेचा यत्न |
| १७२१ फाल्गु. वा ।। ३ | १८०० मार्च १३ | नानांचा पुणे येथें त्यांचे वाड्यांत गुरुवारी रात्री स्वर्गवास. |

**संदर्भ सूची**


| | |
|---|---|
| खरे वासुदेव वामनशास्त्री | अधिकार –योग |
| खरे वासुदेव वामनशास्त्री | नाना फडणवीसांचे चरित्र |
| य. ना. देवधर | नाना फडणवीस |
| अनु. भिमराव कुळकर्णी | |
| सई परांजपे | प्रकाशित लेख |
| वि.दा.सावरकर | समग्र सावरकर खंड ३ |